- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : रविवार, २६ जुलै २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २२७ | किंमत : २ रूपये


**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,४८,७०० /-
- २३ कॅरेट : १,४६,३५० /-
- चांदी : २,३८,३००/-


**विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...**

विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...

- दैनिक सिंहवाणी वृत्त -

९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६



**सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...**

नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...

- आजच संपर्क करा -

८६९८७८८६६६
९६५७२३२०२६


# झुरळांपुढे सरकार नमले!

# धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

धर्मेंद्र प्रधान यांनी त्यांच्या पदाचा दिलेला राजीनामा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अखेर स्वीकारला आहे. नीट पेपर फुटीप्रकरणी आणि ढिसाळ शिक्षण व्यवस्थेविरोधात दिल्लीच्या जंतर-मंतरपासून ते पाटण्यापर्यंत हजारो विद्यार्थ्यांनी पुकारलेल्या तीव्र आंदोलनानंतर पंतप्रधान मोदींनी हे मोठे पाऊल उचलले आहे. धर्मेंद्र प्रधान यांनी शनिवारी दुपारी या संपूर्ण प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारत आपला राजीनामा पंतप्रधानांकडे सुपूर्द केला होता. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर शिक्षण खात्याचा प्रदभार आता प्रल्हाद जोशी यांच्याकडे सोपवण्यात आला आहे.

धर्मेंद्र प्रधान यांनी शिक्षणमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनीही तब्बल २६ दिवस उपोषण केले होते. सरकारच्या आश्वासनानंतर त्यांनी उपोषण मागे घेतले होते.




धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा मंजूर झाल्याची बातमी येताच 'कॉकरोच जनता पार्टी' आणि विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला. दिल्लीतील जंतर-मंतरवर तरुण ढोल-ताशे वाजवत नाचताना आणि विजयोत्सव साजरा करताना दिसले. शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याव्यतिरिक्त सीजेपीच्या इतरही प्रमुख मागण्या सरकारने मान्य केल्या आहेत, ज्यामध्ये पीडित कुटुंबांना नुकसान भरपाई देण्याचा समावेश आहे. २० जुलै रोजी दिल्लीत संसदेवर काढण्यात आलेल्या मोर्चावर पोलिसांनी केलेल्या लाठीमारानंतर या आंदोलनाला हिंसक वळण लागले होते आणि सरकार पूर्णपणे बॅकफुटवर आले होते. अखेर पंतप्रधान मोदींनी स्वतः मध्यस्थी करत विद्यार्थ्यांच्या मागण्या रास्त असल्याचे सांगत दिलासा दिला.सरकार आणि 'कॉकरोच जनता पार्टी' यांच्यात तीन फेऱ्यांच्या चर्चेनंतर अखेर तोडगा निघाला. २४ जुलै रोजी पंतप्रधान मोदींच्या सूचनेनुसार 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी' मध्ये मोठे प्रशासकीय फेरबदल करण्यात आले. शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा मंजूर झाल्यानंतर आता सीजेपीकडूनही आपले आंदोलन अधिकृतपणे मागे घेण्याची घोषणा करण्यात आली आहे.

राजीनाम्यानंतर धर्मेंद्र प्रधान यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर पोस्ट करत लिहिले की, "मी पहिल्या दिवसापासून या घटनेची नैतिक जबाबदारी स्वीकारली आहे आणि या परिस्थितीपासून कधीही तोंड लपवले नाही. गेल्या १० दिवसांतील घटनाक्रम पाहून माझे मन अत्यंत दुखी झाले आहे. हा माझ्यासाठी वैयक्तिक प्रतिष्ठेचा विषय नाही. जंतर-मंतरवर आणि देशात निर्माण झालेल्या परिस्थितीचा देशविरोधी शक्तींनी गैरफायदा घेऊ नये आणि देशाची एकता अबाधित राहावी, म्हणूनच मी हा निर्णय घेतला आहे. आदरणीय पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली देशसेवेची संधी मिळाली, याबद्दल मी त्यांचा आभारी आहे."

## प्रल्हाद जोशी नवे शिक्षणमंत्री

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर, मोदी सरकारने प्रल्हाद जोशी यांच्याकडे शिक्षण मंत्रालयाची अतिरिक्त जबाबदारी सोपवली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी कॅबिनेट मंत्री प्रल्हाद जोशी यांच्याकडे शिक्षण मंत्रालयाचा कार्यभार सोपवण्याचे निर्देश दिले आहेत. केंद्र सरकारने संघटनेच्या सर्व मागण्या मान्य केल्यानंतर, कॉकरोच जनता पार्टीने (सीजेपी) शनिवारी नीट वादावरील आपले आंदोलन मागे घेतल्याची घोषणा केली.



थोडक्यात

## पोलिसाकडून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**अकोला :** अकोल्यामध्ये पोलिसाने अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. हा पोलिस ज्या घरात भाड्याने राहत होता त्याच घरमालकाच्या मुलीसोबत त्याने हे भयंकर कृत्य केले. या घटनेनंतर चिंतेत असलेल्या मुलीने आत्महत्येचा प्रयत्न केला. या मुलीची प्रकृती गंभीर असून ती कोमात गेली आहे. तिच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेच्या निषेधार्थ नातेवाईकांसह गावक-यांचे पोलिस उपविभागीय कार्यालयावर ठिय्या आंदोलन सुरू आहे. 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' महाराष्ट्र पोलिसांचे ब्रीदवाक्य. याचाच विसर पोलिसांना पडला आहे. याची प्रचीती देणारी घटना अकोल्यातून समोर आली आहे. अकोल्यातल्या बाळापुरात भाड्याच्या घरात राहणाऱ्या एका पोलिस कर्मचाऱ्याने घरमालकाच्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार केला. या घटनेनंतर पीडित मुलीने गळफास घेत आत्महत्येचा प्रयत्न केला. सुदैवाने तिचे प्राण वाचवत कुटुंबीयांनी तिला रुग्णालयात दाखल केले. या मुलीची प्रकृती चिंताजनक असून ती सध्या कोमात आहे. दरम्यान, या घटनेच्या निषेधार्थ पीडित मुलीच्या नातेवाईकांसह गावकऱ्यांनी पोलिस उपविभागीय कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले.

पवन वडगावे या पोलिस कर्मचाऱ्याला तातडीने अटक करावे, अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा आंदोलकांनी दिला. या प्रकरणात बाळापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असून तो तिथेच कार्यरत होता. त्यामुळे येथील पोलिसांनी पवन वडगावेला फरार होण्यास मदत केल्याचा आरोप पीडित मुलीच्या नातेवाईकांनी केला आहे.

# ट्रम्पचा पुन्हा धक्का, भारतासह ६० देशांवर टॅरिफ



**वृत्तसंस्था, वॉशिंग्टन**

अमेरिकेने भारतासह १७ देशांमधून आयात होणाऱ्या वस्तूंवर १० टक्के तर ४३ देशांवर १२.५ टक्के टॅरिफ लावण्याचा निर्णय घेतला आहे. सक्तीच्या मजुरीद्वारे तयार केलेल्या वस्तूंविरोधातील कारवाईचा हा भाग असल्याचे अमेरिकेने स्पष्ट केले.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी जारी केलेल्या निवेदनात सांगितले की, संबंधित देशांनी सक्तीच्या मजुरीतून तयार झालेल्या वस्तूंवरील बंदी प्रभावीपणे अमलात आणावी, यासाठी १० टक्के आयातकर लागू करण्यात येत आहे. यापूर्वी ३ जून रोजी अमेरिकेने व्यापार कायद्यातील कलम ३०१ अंतर्गत भारतावर १२.५ टक्के आयातकर प्रस्तावित केला होता. अमेरिकेने आधी भारतावर १२.५ टक्के उच्च कर लावण्याचे ठरवले होते. परंतु, भारताने सक्तीच्या मजुरीविरुद्धच्या नियमांत त्वरित सुधारणा केल्यामुळे अमेरिकेने हा कर कमी करून १० टक्के केला. यामुळे इतर देशांच्या तुलनेत भारतीय मालाला फायदा मिळेल.

१० टक्के कर श्रेणीमध्ये भारत, कॅनडा, युनायटेड किंगडम, मेक्सिको आणि युरोपियन युनियनसह १७ देशांचा समावेश आहे. या देशांवरील आयात शुल्क तुलनेने कमी ठेवण्यात आले आहे. यूएस-मेक्सिको-कॅनडा करारातील वस्तूंना यात सवलत देण्यात आली आहे.

१२.५ टक्के कर श्रेणीमध्ये ब्राझील, चिली, चीन, जपान आणि रशियासह ४३ देशांचा समावेश आहे. तेल, गॅस आणि खते या उत्पादनांना या करातून पूर्णपणे वगळण्यात आले आहे. या देशांनी सक्तीच्या मजुरीवरील आयातबंदीची प्रभावी अंमलबजावणी केली नसल्याचा दावा आहे.

**जगभरातून तीव्र विरोध**

ट्रम्प प्रशासनाच्या या निर्णयाचा जगभरातून तीव्र विरोध होत आहे. ब्राझीलने अमेरिकेविरुद्ध जशास तसे कर लावण्याचा इशारा दिला आहे. चिलीनेही यावर आक्षेप घेतला आहे.

## टीईटी पेपरफुटी प्रकरणात मुख्य सूत्रधार बिजेंद्र गुप्ता अटकेत



**पुणे :** दिल्लीत नीट पेपरफुटीवरून विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू असताना आता टीईटी पेपरफुटी प्रकरणात मोठी अपडेट समोर येत आहे. टीईटी पेपरफुटी प्रकरणातील मुख्य सूत्रधार आरोपी बिजेंद्र गुप्ता याला अटक करण्यात आली आहे. त्याला लवकरच पुणे विमानतळावर आणण्यात येणार आहे. टीईटी पेपरफुटी प्रकरणाच्या तपासादरम्यान ठाणे पोलिसांनी देशातील अनेक राज्यांत व्यापक शोधमोहीम आणि छापेमारी केली होती. मुख्य आरोपी बिजेंद्र गुप्ताच्या मागावर असलेली पोलिसांची विशेष पथके बिहार, दिल्ली, उत्तर प्रदेश आणि हरियाणा येथे सक्रिय होती. बिहारमधील पाटणा आणि समस्तीपूर परिसरातही सखोल शोधमोहीम राबवण्यात आली. अखेर दीर्घकाळ पोलिसांना गुंगारा देणाऱ्या बिजेंद्र गुप्ताला बिहारमधून अटक करण्यात पोलिसांना यश आले.






# 'जेन झी'ने सरकारचा झिंज्या उपटल्या, ठाकरे बंधूंचा हल्लाबोल

## मुंबईतील उद्याचा मोर्चा होणारच!

**वृत्तसंस्था, मुंबई**

देशातील तरुण पिढीने अर्थात जेन झीने आपल्या सनदशीर आंदोलनाच्या जोरावर केंद्र सरकारचा मस्तवालपणा उतरवला आहे. जेन झी झीने सरकारची मस्ती जिरवली आहे आणि त्यांच्या झिंज्या उपटल्या आहेत. या विद्यार्थ्यांनी अख्ख्या देशाला भयाने पछाडलेल्या जाळ्यातून बाहेर काढले असून, देशात युवाशक्ती एकत्र आल्यास ती काय करू शकते, याची ही फक्त एक झलक आहे, अशा शब्दांत शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी (आज दि. २५) संयुक्त पत्रकार परिषदेत जंतर मंतरवर सुरु असणाऱ्या विद्यार्थी आंदोलनांचे कौतूक केले. तसेच, उद्या शिवाजी पार्क ते सिद्धिविनायक मंदिर असा मोर्चा निघणारच, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

पत्रकार परिषदेत बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, भाजप सरकारने देशात असा भ्रम निर्माण केला होता की, देशात आता नागरिक उरलेलेच नाहीत, ती केवळ झुरळे आहेत. परंतु, या एका झुरळाने (सामान्य विद्यार्थ्याने) हुकूमशाही सरकारला झुकवून दाखवले आहे. हा विषय केवळ एका राजीनाम्यापुरता मर्यादित नव्हता. या ऐतिहासिक आंदोलनाचे नेतृत्व करणा-या अभिजित दिपके यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. आंदोलन मागे घेतलेले नाही! अभिजित दिपके यांनी आंदोलन मागे घेतलेले नाही. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मुख्य मागणी मान्य झाली असली, तरी विद्यार्थ्यांच्या आणखी दोन महत्त्वाच्या मागण्या अद्याप बाकी आहेत. त्या मान्य होणे अत्यंत आवश्यक आहे, असे ठाकरे यांनी स्पष्ट केले.

**विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेणार का?**

आंदोलनादरम्यान घडलेल्या प्रकारावर ताशेरे ओढताना उद्धव ठाकरे यांनी गृह मंत्रालयावर गंभीर आरोप केले. विद्यार्थ्यांच्या शांततापूर्ण आंदोलनात साध्या वेषातील गुंड घुसवण्यात आले होते. आंदोलक विद्यार्थ्यांवर पोलीस गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आता स्पष्ट खुलासा करावा की, या निष्पाप विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेतले जाणार आहेत का? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.

**सरकारची मस्ती जिरवली : राज ठाकरे**

झेन झीने सरकारची मस्ती जिरवली आहे आणि त्यांच्या झिंज्या उपटल्या आहेत, असे म्हणत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आंदोलक तरुणांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला. दरम्यान, राज्यातील राजकीय घडामोडींवर बोलताना त्यांनी मुख्यमंत्र्यांवर निशाणा साधला. मुख्यमंत्री फडणवीस अचानक दिल्लीला का गेले, हे मला माहित नाही. त्याबाबतचा खुलासा त्यांनी स्वतःच करायला हवा, असा टोला राज ठाकरे यांनी लगावला. केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात आणि विद्यार्थ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी उद्याचा नियोजित मोर्चा वेळेवरच निघणार असल्याचे स्पष्ट करत दादर येथील ऐतिहासिक शिवाजी पार्कपासून ते सिद्धिविनायक मंदिरापर्यंत हा भव्य मोर्चा काढला जाणार असून, त्यात नागरिकांनी आणि तरुणांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही उद्धव ठाकरे यांनी केले.

संपादकीय लेखणीतून...

# शिक्षण प्रणाली सुदृढ करायची असेल तर!

देशातील राजकीय पुढाऱ्यांनी व उच्च पदस्थ अधिकारी आपल्या मुला-मुलींना विदेशात शिक्षणासाठी पाठवितात याचा अर्थ असा समजावा का की, देशातील शिक्षण योग्य नाही.अहो देशातील आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांनी देशातील विद्यार्थ्यांना विदेशात उच्च शिक्षणासाठी विदेशात पाठविण्याची पद्धत आहे आणि पाठविले पाहिजे.परंतु आपल्या देशात उलटी गंगा वाहतांना दिसते.देशातील सर्वसामान्य विद्यार्थी देशात सरकारी शाळा-महाविद्यालयात शिकतो आणि तीथेही त्याला पेपर फुटीचा व अन्य गोष्टींचा सामना करावा लागतो. परंतु राजकीय पुढारी या भानगडीत न पडता आपल्या मुलामुलींना सरळ विदेशात शिक्षणासाठी पाठवून देशातील शिक्षण प्रणाली खोकला करतांना दिसते. त्यामुळे यांना विद्यार्थ्यांच्या प्रती कशी काय आपुलकी रहाणार! अरे राजकीय पुढाऱ्यांनो विद्यार्थ्यांच्या प्रती काहीतरी दयामाया ठेवा! सध्या देशात काय सुरू आहे हे देशातील जनतेला कळायला मार्ग नाही. कोणताही राजकीय हेतू न बाळगता ज्या विद्यार्थ्यांनी सीजेपीच्या अंतर्गत आपल्या मागण्यांच्या संदर्भात आंदोलन दिनांक २० जूनला सुरू केले ते १९ जुलै पर्यंत शांततेत चालले या ३० दिवसांच्या कालावधीत सरकार झोपली होती का? या कालावधीत सरकार शांतपणे चर्चा करू शकले असते.परंतू सरकारने उपोषण करत्यांसोबत कोणतीही चर्चा केली नाही आणि २० जुलै २०२६ ला लोकशाही प्रणालीवर घणाघाती प्रहार करून लोकशाहीची वाट लावून लाठीचार्ज व बळाचा वापर केला.

सरकार व सरकारमधील राजकीय पुढारी (लोकप्रतिनिधी) म्हणतात की, असामाजिक तत्वाचे लोक आंदोलन स्थळी होते आणि त्यांनी हिंसेला सुरुवात केली. त्यामुळे आम्ही तीथे बळाचा वापर केला आणि असेही सांगितले जाते की,आंदोलन स्थळी चार ट्रक दगड आणले होते.आंदोलन स्थळी गेल्या ३० दिवसांपासूनचा दिल्ली पोलिस विभाग, अन्य सुरक्षा विभाग व केंद्रीय रीजर्व पोलीस विभागाचा घेरा त्या ठिकाणी असतांना ४ ट्रक दगड आलेच कोठुन याचेही आश्चर्य म्हणावे लागेल! याची सहनीशा सरकारने वेळेच्या आधीच का केली नाही? यावरून स्पष्ट होते की, सरकार सावरासावर करण्यासाठी निव्वळ खोटे बोलत असावे. सरकार म्हणते की,आम्ही काहीच केले नाही जे काही झाले ते असामाजिक तत्वांकडून झाले त्यामुळे आम्ही बळाचा वापर केला ही अत्यंत शर्मनाक व चिंताजनक घटना म्हणावी लागेल. यावरून स्पष्ट होते की, सरकार कुठेतरी नक्कीच खोटं बोलत आहे. आंदोलन पांगवण्यासाठी सरकारजवळ अनेक शांततेचे मार्ग होते. वॉटर कॅनलचा वापर करून आंदोलन पांगवू शकले असते किंवा शांत करू शकले असते. परंतू सरकारने शांततेचा मार्ग अवलंबणे योग्य समजले नसावे व बळाच्या वापराला जास्त महत्त्व दिले असावे यामुळे हिंसेचे गालबोट देशाला लागले. यात मोठ्या प्रमाणात विद्यार्थी गंभीररीत्या जखमी झाले. या आंदोलना दरम्यान सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठासमोर अधिवक्ता नरेंद्र मिश्रा यांनी या प्रकरणाचा उल्लेख करत लवकरच सुनावणी घेण्याची मागणी केली.यावर सरन्यायाधीश म्हणाले की,आमचा आणि तुमचा वेळ वाया घालवू नका. सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले की, त्यांच्याकडे असे व्हिडिओ आहेत, ज्यामध्ये पोलिसांची कथित दडपशाही दिसून येते.

यावर सरन्यायाधीश म्हणतात की, आम्हाला व्हिडिओमध्ये रस नाही. आमच्याकडे व्हिडीओ पाहण्यासाठी वेळ नाही.ही कसली न्यायीक भाषा म्हणावी! ही विद्यार्थ्यांच्या प्रती मोठी शोकांतिका म्हणावी लागेल.सरकार म्हणत आहे की,विरोधी पक्ष या आंदोलनाचे राजकारण करीत आहेत. कोण राजकारण करीत आहे याच्याशी विद्यार्थ्यांना काहीही देणेघेणे नाही. कारण हा विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न आहे. सरकार जवळ आंदोलन शांत करण्यासाठी ३० दिवसांचा कालावधी होता,या ३० दिवसांत सरकारने तोडगा काढु शकली असती, परंतु तोडगा का काढला नाही? शिक्षण विभागाचे सर्वेसर्वा शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान आहेत पेपर फुटीमध्ये २० पेक्षा जास्त विद्यार्थीनी आत्महत्या केल्या ही जबाबदारी सरकार का स्वीकारत नाही? व शिक्षणमंत्र्याचा राजीनामा का घेत नाही? म्हणजे शिक्षणमंत्र्यांचे काहीच दायित्व नाही का? यावरून स्पष्ट होते की, शिक्षण मंत्र्यांना सत्ता आणि आपली खुर्ची विद्यार्थ्यांच्या भविष्यापेक्षा महत्त्वाची वाटत असावी.त्यामुळेच देशात हिंसेचे गालबोट लागले.त्यामुळेच आज या आंदोलनाच्या समर्थनार्थ संपूर्ण देश एकवटला आहे. सीजेपीच्या आंदोलनात कोणतेही राजकारण नव्हतेच परंतु राजकारण करण्याचे काम सरकारने केले आणि आता विरोधी पक्ष मोठ्या प्रमाणात राजकारण करीत आहे.

# धुमसणारे जंतर-मंतर : ध्येयापासून भरकटलेले विद्यार्थी आंदोलन

**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल**
**वर्धा**

नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथील विद्यार्थी आंदोलन नीट पेपरफुटी आणि परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींवरून सुरू झाले होते. मात्र, जस-जसे दिवस लोटले, तसे हे आंदोलन केवळ एका मुद्दा पुरते मर्यादित न राहता आता या आंदोलनात असामाजिक तत्त्वांचा व राजकारणाचा शिरकाव झाल्याने मूळ ध्येयापासून भरकटल्याचे दिसून येत आहे.

दिल्लीतील जंतर-मंतर येथील विद्यार्थी आंदोलन नीट आणि इतर राष्ट्रीय परीक्षांमधील पेपरफुटीच्या निषेधार्थ केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची आणि उत्तरदायित्वाची स्पष्ट मागणी करत शिस्तबद्ध पद्धतीने सुरू झाले, मात्र आता या आंदोलनाची दिशा बदलली असून आता हे आंदोलन दिशाहीन होत चालले आहे. लोकशाहीत शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनादत्त अधिकार आहे, मात्र आंदोलनाच्या नावाखाली हिंसाचार करणे आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे हे पूर्णपणे अयोग्य असून यामुळे देशात अस्थिरता निर्माण होते. भारतीय संविधानातील कलम १९(१)(ब) नुसार नागरिकांना शांततेने आणि शस्त्रांशिवाय एकत्र जमण्याचा आणि निषेध नोंदवण्याचा मूलभूत अधिकार आहे. सर्वोच्च न्यायालयाने वारंवार स्पष्ट केले आहे की, आंदोलनाच्या नावावर हिंसाचार, तोडफोड किंवा सार्वजनिक रस्ते अनिश्चित काळासाठी रोखणे हा कायदेशीर अधिकार असू शकत नाही.

आपल्या रास्त मागण्यांसाठी आवाज उठवणे हा लोकशाही हक्क आहे आणि विद्यार्थ्यांच्या खऱ्या समस्यांना राजकीय रंग देऊन त्यांना कमी लेखू नये. सध्य स्थितीत दिल्लीतील जंतर-मंतर वर जे आंदोलन सुरू आहे, हे आंदोलन आता भरकटले आहे विद्यार्थ्यांच्या नीट पेपर लीक प्रकरणी या आंदोलनाची सुरुवात झाली, मात्र आता हे आंदोलन मुळ लक्षापासून भरकटले असून या आंदोलनाच्या माध्यमातून देशात अस्थिरता निर्माण करण्याचा विघातक उद्देश या आंदोलनाच्या माध्यमातून दिसून येत आहे.

नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथील विद्यार्थी आंदोलन नीट पेपरफुटी आणि परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींवरून सुरू झाले होते. मात्र, जस-जसे दिवस लोटले, तसे हे आंदोलन केवळ एका मुद्यापुरते मर्यादित न राहता शिक्षण क्षेत्रातील विषमता, बेरोजगारी आणि इतर राजकीय मागण्यांकडे वळल्यामुळे मूळ ध्येयापासून भरकटल्याचे दिसून येत आहे. विद्यार्थी आंदोलनांमध्ये असामाजिक व अराजक तत्त्वांचा शिरकाव झाल्याने शांततापूर्ण निदर्शनांना हिंसक वळण लागल्याचा गंभीर आरोप विविध राजकीय नेते, बार कौन्सिल आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी केला आहे. जंतर-मंतर व अन्य भागांतील निदर्शनांदरम्यान काही उपद्रवी घटकांकडून पोलिसांवर दगडफेक व हल्ले झाल्याचे समोर आले आहे.हे आंदोलन मूळ मुद्यांपासून विचलित झाले आहे.परीक्षेतील गैरव्यवहार व पेपरफुटीसारख्या विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्या बाजूला राहून, आंदोलनाचा वापर संकुचित राजकीय व देशविरोधी अजेंडा राबवण्यासाठी केला जात असल्याचा दावा केला जात आहे. काही राजकीय व बाह्य शक्ती विद्यार्थ्यांना भडकवून देशात कायदा व सुव्यवस्था बिघडवण्याचा प्रयत्न करत आहेत. या आंदोलनांमागे काही बाह्य किंवा देशविरोधी शक्तींचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त करून, मूळ समस्येचे निराकरण करण्याऐवजी वातावरण कलुषित केले जात असल्याचे म्हटले जाते. आंदोलनाला भडकवण्यासाठी बाहेरील समाजकंटक व समाजमाध्यमांचा गैरवापर झाल्याचे समोर आले आहे.

दुसरीकडे, आंदोलन करणारे विद्यार्थी, पालक आणि त्यांचे समर्थक म्हणतात की, हे आंदोलन पूर्णपणे त्यांच्या भविष्याशी, परीक्षेतील कथित अनियमितता, पेपरफुटी आणि पारदर्शकतेच्या मागणीशी संबंधित आहे.

सरकारने पेपरफुटीविरोधात कठोर कायदे, जलदगती न्यायालये आणि पारदर्शक परीक्षा घेण्याची भूमिका घेतली असतानाही आंदोलने सुरू ठेवणे म्हणजे राजकारण असल्याचा युक्तिवाद केला जातो. सत्ताधारी पक्षाच्या काही विश्लेषक आणि समर्थकांचा असा विश्वास आहे की, परीक्षा वादावरून होणाऱ्या मोठ्या आंदोलनांमागे विरोधी पक्ष किंवा बाह्य शक्तींचा हात असून, सरकारला कोंडीत पकडणे आणि अस्थिरता निर्माण करणे हा त्यामागील उद्देश आहे.

दरम्यान, २० जुलै रोजी संसदेवर मार्च काढण्याच्या प्रयत्नादरम्यान पोलीस व आंदोलकांमध्ये झटापट झाली, ज्यामध्ये लाठीचार्ज व अश्रूधुराचा वापर करण्यात आला.

**राजकीय सहभाग**

विविध राजकीय पक्ष व नेत्यांनी यात सहभाग घेतल्यामुळे आंदोलनाची मूळ विद्यार्थी दिशा बदलून त्याला राजकीय स्वरूप प्राप्त झाले. विद्यार्थ्यांच्या परीक्षांमधील गैरव्यवहार आणि पेपरफुटीच्या मुद्द्यांवरून सुरू असलेल्या आंदोलनांमध्ये मूळ शैक्षणिक मागण्या मागे पडून राजकीय व वैचारिक हितसंबंध जपले जात आहे. तरी देखील संसदेपासून रस्त्यांपर्यंत झालेली हिंसक निदर्शने आणि कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती पाहता, याकडे लोकशाही नियमांचे उल्लंघन आणि देशाची प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न म्हणूनही पाहिले जात आहे.

कोणत्याही समस्येवर हिंसेऐवजी सरकार आणि आंदोलनकर्त्यांमध्ये शांततापूर्ण संवाद होणे गरजेचे आहे.आपल्या मागण्या मांडताना देशाच्या कायद्याचे आणि सुव्यवस्थेचे पालन करणे ही प्रत्येक सुजाण नागरिकाची जबाबदारी आहे. आंदोलनात हिंसेऐवजी शांततापूर्ण संवाद आणि कायद्याचे पालन करणे गरजेचे आहे, कारण यामुळे लोकांचे संरक्षण होते, देशाची सुव्यवस्था टिकते आणि समस्यांवर योग्य व लवकरात लवकर तोडगा निघतो.

- ९५६१५९४३०६

# स्टेडियमच्या लखलखाटात हरवलेला सामाजिक आवाजः जंतरमंतरवरील विद्यार्थी आंदोलनावर क्रिकेटपटू गप्प का?

**डॉ. दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

ज्या विद्यार्थ्यांच्या जीवावर अब्जावधींचे साम्राज्य उभारले, त्यांच्याच संकटसमयी खेळाडूंचे मौन! नवी दिल्लीचे जंतरमंतर हे देशातील न्याय, हक्क आणि लोकशाहीच्या आवाजाचे प्रमुख केंद्र मानले जाते. जेव्हा जेव्हा देशातील तरुण किंवा विद्यार्थी आपल्या भविष्यासाठी, शिक्षणातील अन्यायाविरोधात,

पेपरफुटीविरुद्ध किंवा पारदर्शकतेसाठी रस्त्यावर उतरतात, तेव्हा जंतरमंतरवरून उठणारा आवाज थेट संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतो. परंतु, या आंदोलनांच्या गदारोळात एका गोष्टीचे मौन सर्वाधिक चटका लावणारे ठरते–ते म्हणजे देशातील ताकदवान आणि प्रभावशाली 'युथ आयकॉन' म्हणजेच आपल्या क्रिकेटपटूंचे मौन!

लाखो-करोडो तरुणांच्या गळ्यातील ताईत असलेले, एका सोशल मीडिया पोस्टवर कोट्यवधींचे लाईक्स मिळवणारे क्रिकेटपटू अशा संवेदनशील विद्यार्थी आंदोलनांवर मौन बाळगणेच का पसंत करतात? यामागे कोणती सामाजिक व व्यावसायिक गणिते दडली आहेत?

**मौनामागची प्रमुख कारणेः व्यावसायिक हित की राजकीय भीती?**

अब्जावधींचे ब्रँड आणि करारांचे बंधनः आजचा क्रिकेटपटू हा फक्त खेळाडू राहिलेला नाही, तर तो स्वतःमध्ये एक 'मोठा ब्रँड' आहे. बीसीसीआयचे केंद्रीय करार, आयपीएलच्या फ्रेंचायझी आणि कॉर्पोरेट कंपन्यांच्या करोडो रुपयांच्या जाहिराती यांमध्ये ते बांधलेले असतात. कोणत्याही राजकीय किंवा वादग्रस्त सामाजिक मुद्द्यावर थेट बोलल्यास ब्रँड व्हॅल्यू घसरण्याची किंवा जाहिराती हातातून जाण्याची भीती त्यांच्या मनात असते.

**ट्रोलिंग आणि राजकीय रोषाची भीतीः** आजच्या डिजिटल युगात एखादे विधान तात्काळ वादाच्या भोवऱ्यात अडकू शकते. विद्यार्थ्यांच्या किंवा कोणत्याही सामाजिक आंदोलनाला पाठिंबा देणे म्हणजे थेट सत्ताधारी किंवा विशिष्ट विचारसरणीचा रोष अंगावर घेणे, असा अर्थ लावला जातो. त्यामुळे वादापासून चार हात लांब राहणे हाच 'सुरक्षित मार्ग' मानला जातो.

'खेळ आणि राजकारण वेगळे' ही सोयीस्कर भूमिकाः अनेकदा "आम्ही फक्त खेळाडू आहोत, आमचे काम मैदानात खेळणे आहे," अशी सोयीस्कर भूमिका घेतली जाते. परंतु, देशातील तरुण जेव्हा स्वतःच्या हक्कासाठी संघर्ष करत असतात, तेव्हा क्रीडा क्षेत्राचे दायित्व केवळ मैदानापुरतेच मर्यादित राहते का, हा प्रश्न उरतोच.

**जागतिक क्रीडापटू विरुद्ध भारतीय वास्तव**

**जागतिक स्तरावरील खेळाडूंचे सामाजिक भानः -**

मार्कस रॅशफोर्ड (फुटबॉल): ब्रिटनमधील गरीब विद्यार्थ्यांच्या मोफत जेवणासाठी सरकारविरोधात थेट लढा दिला आणि सरकारला आपला निर्णय बदलावा लागला.

**लेब्रॉन जेम्स (बास्केटबॉल):** अमेरिकेतील सामाजिक अन्याय आणि विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सतत उघड भूमिका घेतात व स्वतः शाळा चालवतात.

**मुहम्मद अली (बॉक्सिंग):** आपले संपूर्ण करिअर पणाला लावून नागरी हक्क आणि तरुणांच्या न्यायासाठी आयुष्यभर उभे राहिले.

या तुलनेत भारतीय क्रिकेटपटूंचे मौन अधिक ठळकपणे जाणवते. आपल्याकडे खेळाडूंना 'देव' मानले जाते, पण गरज पडल्यास ते विद्यार्थ्यांच्या पाठीशी साधे नैतिक पाठबळ म्हणूनही उभे ठाकत नाहीत.

**विद्यार्थ्यांचा रोष आणि बहिष्कारः भविष्यातील मोठा धोक्याचा इशारा!**

भारतीय क्रिकेटचे संपूर्ण साम्राज्य हे या देशातील तरुण आणि विद्यार्थ्यांच्या विश्वासावर उभारलेले आहे. हेच विद्यार्थी रात्रंदिवस सामने बघतात, महागडी तिकिटे खरेदी करतात आणि खेळाडूंना डोक्यावर घेतात. या प्रेमामुळेच क्रिकेटपटूंना कोट्यवधींची कमाई, प्रसिद्धी आणि 'स्टारडम' मिळते.

परंतु, आज जेव्हा हेच विद्यार्थी जंतरमंतरवर स्वतःच्या भविष्याची लढाई लढत आहेत, तेव्हा या मुजोर आणि स्वार्थी बनलेल्या खेळाडूंनी त्यांच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. हा राग जर विद्यार्थ्यांच्या डोक्यात बसला आणि त्यांनी क्रिकेटसह या खेळाडूंवर, त्यांच्या जाहिरातींवर व ब्रँड्सवर पूर्ण बहिष्कार टाकला, तर हे तथाकथित 'स्टार्स' एका रात्रीत जमिनीवर येतील. विद्यार्थ्यांच्या पाठिंब्याशिवाय या क्रिकेटपटूंना आणि त्यांच्या ब्रँड्सना कुत्रीही विचारणार नाही, हे या खेळाडूंनी वेळीच लक्षात ठेवले पाहिजे!

**मौन हेसुद्धा एक वक्तव्यच!**

विद्यार्थी हेच देशाचे भविष्य आहेत आणि याच तरुणांच्या जोरावर क्रीडाविश्वातील संपूर्ण ताकद टिकून आहे. तटस्थ राहणे हा प्रत्येकाचा वैयक्तिक अधिकार असू शकतो; परंतु जेव्हा प्रश्न विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांचा आणि भविष्याचा असतो, तेव्हा मौन बाळगणे हे नकळत अन्यायाच्या बाजूने उभे राहण्यासारखेच ठरते.

क्रिकेटपटूंनी मैदानात मारलेले षटकार जितके टाळ्या मिळवतात, तितकाच समाजातील अन्यायाविरोधात दाखवलेला धीटपणा त्यांना खऱ्या अर्थाने 'राष्ट्रनायक' बनवू शकतो. जर खेळाडू वेळेवर जागे झाले नाहीत, तर विद्यार्थ्यांचा सनदशीर बहिष्कार त्यांचे साम्राज्य उध्वस्त केल्याशिवाय राहणार नाही!

- ९०९६३७२०८२

# भारत देश विजयी : देशभर आनंदोत्सव!

**कृष्णकुमार निकोडे**
**गडचिरोली**

कारगिल युद्ध आधुनिक इतिहासातील अतिउंचीवरच्या युद्धाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. यात युद्धाला लागणारी सामग्री व मनुष्यबळ ने-आण करण्याचा चांगलाच अनुभव भारतीय सैन्याला मिळाला. हे युद्ध दोन्ही देश अण्वस्त्रसज्ज झाल्यानंतरचे पहिलेच युद्ध होते. त्यामुळे सर्व जगाचे लक्ष या युद्धाकडे लागले होते. परंतु भारताने हे युद्ध कारगिलपुरतेच मर्यादित ठेवले. शेवटी कारगिल युद्ध भारताने जिंकले.

इ.स.१९९८-९९ च्या हिवाळ्यात पाकिस्तानी लष्करातून अनेक तुकड्यांना मुजाहिदीनच्या वेषात भारतात नियंत्रण रेषेपलीकडे पाठवण्यात आले. या कारवाईला ऑपरेशन बद्र असे नाव देण्यात आले. कुणाच्याही लक्षात न येता त्यांनी रिकाम्या भारतीय चौक्यांचा ताबा घेतला. हिवाळ्यात प्रचंड थंडीमुळे सैन्य माघारी घेतले गेले. नियंत्रण रेषेच्या जास्तीत जास्त आत घुसखोरी करून राष्ट्रीय महामार्ग १च्या जवळ यायचे. असे केले, की महामार्गावर कायमस्वरूपी ताबा मिळवता येईल. नंतर राजकीय वजन वापरून काश्मीरच्या प्रश्नाचे आंतरराष्ट्रीयीकरण करणे पाकिस्तानला सोपे पडेल, असा हा या कारवाईचा मुख्य उद्देश होता. भारताला नवीन नियंत्रणरेषा मान्य करायला भाग पाडले, की लडाख व सियाचीनला भारतापासून तोडणे सोपे जाईल, असा पाकिस्तानी युद्धनीतिज्ञांचा कयास होता. तसेच घुसखोरीदरम्यान कारगील- काश्मीर परिसरात अंतर्गत बंडखोरी भडकावून भारताला अजून बुचकळ्यात पाडण्याचा पाकिस्तानी व्यूह होता. भारतीयांनी सियाचीन हिमनदीवर नियंत्रण मिळवण्यात जी क्लृप्ती वापरली. तसाच काहीसा प्रकार पाकिस्तानने केला, असा काही लेखकांचा सूर होता.

कारगिल युद्ध हे भारत व पाकिस्तान यांच्या दरम्यान सन १९९९च्या उन्हाळ्यात लढले गेलेले मर्यादित युद्ध होते. या युद्धाची व्याप्ती भारताच्या कारगिल व आजूबाजूच्या परिसरापुरतीच मर्यादित राहिली, त्यामुळे याला मर्यादित युद्ध म्हणतात. तसेच या पूर्वीच्या भारत-पाक युद्धांप्रमाणेच याही युद्धात, युद्ध सुरू झाल्याची व संपल्याची कोणतीही घोषणा करण्यात आलेली नव्हती. उलट पाकिस्तानतर्फे युद्धादरम्यान त्यांचा देश अलिप्त आहे, असा कांगावा करण्यात आला होता. पुढे अनेक वर्षांनंतर हळुहळू पाकिस्तान सरकारने व अनेक लष्करी अधिकाऱ्यांनी हे युद्धच होते, असे जाहीर केले. सन १९९९च्या उन्हाळ्यात पाकिस्तानी घुसखोरांनी भारतीय सीमा ओलांडून भारताच्या हद्दीतील अनेक ठाणी कब्जात घेतल्याचे भारताच्या लक्षात आले. या घुसखोरांना हुसकावण्यासाठी कारगिलचे युद्ध सुरू झाले. ही ठाणी कारगिल व द्रास परिसरातील अतिउंच दुर्गम जागी होती. अनेक महिन्यांच्या प्रयत्नांनंतर भारताला ही ठाणी परत मिळवण्यात यश मिळाले.

कारगिल हे शहर जम्मू आणि काश्मीरची राजधानी श्रीनगरपासून २०५ किमी अंतरावर भारत-पाक आंतरराष्ट्रीय नियंत्रण रेषेपासून जवळ आहे. हिमालयाच्या इतर भागाप्रमाणे कारगिलमध्येही थंड वातावरण असते. उन्हाळा हा सौम्य तर हिवाळा अतिशय दीर्घ व कडक असतो. बऱ्याचदा तापमान -४० अंशापर्यंतही उतरू शकते. राष्ट्रीय महामार्ग लेह ते श्रीनगर या रस्त्यावर कारगिल वसलेले आहे. कारगिलचे युद्ध होण्याचे प्रमुख कारण हा रस्ता हे होय. घुसखोरांनी पाकव्याप्त काश्मीरच्या जवळच्या आणि रस्त्याला समांतर अशा १६० किलोमीटरच्या पट्ट्यातच साधारणपणे घुसखोरी केली. लष्कराच्या अनेक चौक्या या भागात आहेत. त्यातील काही चौक्या समुद्रसपाटीपासून पाच हजार मीटरपेक्षाही अधिक उंचावर आहेत. नुसतेच कारगिल नव्हे तर आग्नेयेकडील द्रास व नैऋत्येकडील मश्को खोऱ्यातील, तसेच बटालिक विभागातील चौक्यांवरही घुसखोरी झाली.

कारगिल शहर हे सामरिक दृष्ट्या महत्त्वाचे आहे. इ.स.१९७१च्या युद्धानंतर भारत व पाकिस्तानमध्ये थेट मोठे युद्ध झाले नाही. तरी सातत्याने छोट्या मोठ्या चकमकी होत आहेत. भारतीयांच्या सियाचीन हिमनदीवर तसेच सभोवतालच्या परिसरावर नियंत्रण मिळवण्यात दोन्ही बाजू सातत्याने प्रयत्नशील असतात. इ.स.१९८०च्या सुमारास पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी पंजाबात खलिस्तानच्या नावावर दंगा घातला. तसेच इ.स.१९९०च्या सुमारास काश्मीरमध्ये दहशतवादाने मूळ धरले. परिणामी भारताने काश्मीरमध्ये कायमस्वरूपी सैन्य तैनात केले.

हे दहशतवादी सुरुवातीच्या काळात काश्मीरमधील असत व त्यांना प्रशिक्षित करून पाठवले जात असे. काही काळानंतर पाकिस्तानी सैनिक, अधिकारी व तालिबानी अफगाणिस्तानातील भाडोत्री अतिरेक्यांनाही काश्मीरमध्ये पाठवले जाऊ लागले. पाकिस्तानने नेहमीच या बाबतीत आपला सहभाग असल्याचा इन्कार केला. कारगिलच्या युद्धातदेखील पाकिस्तानने हीच खेळी वापरली व घुसखोर हे काश्मिरी स्वातंत्र्यसैनिक आहेत, असे जगाला सांगण्याचा प्रयत्न केला. इ.स.१९९८मध्ये भारत पाकिस्तानने अणुचाचण्या केल्यानंतर दोन्ही देशातील संबंध चांगलेच ताणले गेले. परंतु तत्कालीन पंतप्रधान मा.वाजपेयी साहेबांनी मैत्रीचा हात पुढे करून संबंध निवळण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी ते स्वतः लाहोरला जाऊन आले होते.

द्रास व मश्को खोऱ्यातील चौक्या या अतिउंचीवर आहेत. अतिउंचावरील चौक्यांवर कडक हिवाळ्याच्या महिन्यांत सैन्य तैनात करून ठेवणे अतिशय अवघड असते. हिवाळ्यापूर्वी दोन्ही बाजूने सैन्याची माघार व्हावी, उन्हाळ्यात बर्फ वितळल्यावर व हवामान मानवी रहाण्यास स्थिर झाल्यानंतर ते ते सैन्य आपापल्या चौक्यांमध्ये परतावे, असा अलिखित समझौता भारत-पाकिस्तानमध्ये, कारगिल युद्धाच्या आधीपर्यंत होता.

मात्र सन १९९९ साली भारतीय सैन्य भारतीय चौक्यांवर परतण्यापूर्वीच पाकिस्तानी घुसखोरांनी ऐन हिवाळ्यात चौक्यांचा ताबा घेतला. त्यामुळे कारगिलचे युद्ध भडकण्यास ठिणगी पडली. या चौक्यांचा ताबा घेतला गेल्याने राष्ट्रीय महामार्ग १ए- एनएच१ हा पाकिस्तानी तोफगोळ्यांच्या आणखी जवळच्या टप्प्यांत आला. तसेच उंचावरील चौक्यांचा ताबा घुसखोरांकडे गेल्याने त्यांना उतारावरील चौक्यावर नियंत्रण ठेवणे सोपे गेले. या चौक्या डोंगरमाथ्या वरील किल्ल्यांप्रमाणे होत्या. त्यांचा ताबा मिळवण्यास मोठ्या प्रमाणावर फौजेची गरज लागते. त्यातच अतिउंची व कडाक्याची थंडी हे काम अजूनच अवघड करते.

यात युद्धाला लागणारी सामग्री व मनुष्यबळ ने-आण करण्याचा चांगलाच अनुभव भारतीय सैन्याला मिळाला. हे युद्ध दोन्ही देश अण्वस्त्रसज्ज झाल्यानंतरचे पहिलेच युद्ध होते. त्यामुळे सर्व जगाचे लक्ष या युद्धाकडे लागले होते. परंतु भारताने हे युद्ध कारगिलपुरतेच मर्यादित ठेवले. त्यामुळे दाखवलेल्या संयमाबद्दल भारताचे जगभर कौतुक झाले. म्हणूनच भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर पाठिंबा मिळाला व याउलट, सैन्य मागे घ्यावे, यासाठी पाकिस्तानवर अमेरिकेसह अनेक देशांनी दबाव आणला. या युद्धानंतर भारताने आपल्या संरक्षण खर्चात अनेक पटीने वाढ केली.

- ९६९९८३६७१७

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# भरदिवसा झालेल्या हत्येने हादरले दक्षिण नागपूर

**समझोता करण्याच्या बहाण्याने बोलवून केली हत्या, मध्यस्थी करणारा दुसरा युवक गंभीर तर तिसरा पळाल्यामुळे बचावला, मानेवाडा दहन घाटावरील घटना**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जुना वाद मिटविण्यासाठी बोलावल्याचा विश्वास देत १७ वर्षीय युवकाला मानेवाडा स्मशानभूमीत नेऊन त्याच्यावर धारदार शस्त्रांनी प्राणघातक हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात त्याचा मृत्यू झाला, तर मध्यस्थी करण्यासाठी पुढे आलेला त्याचा मित्र गंभीर जखमी झाला. ही घटना शनिवारी दुपारी हुडकेश्वर पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली असून, शहरात खळबळ उडाली आहे.

मृत युवकाचे नाव पवन सूर्यवंशी (१७, रा. सिद्धीश्वर नगर, वाठोडा) असे आहे. तर जखमी अमन काळे (२०, रा. विठ्ठलनगर) याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

पोलिसांच्या माहितीनुसार, शनिवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास पवनला जुन्या वादावर तोडगा काढण्यासाठी मानेवाडा स्मशानभूमीत बोलावण्यात आले होते. त्याच्यासोबत अमन काळे आणि अजय सोळंकीही गेले होते. सुरुवातीला दोन्ही बाजूंमध्ये चर्चा सुरू असल्याचे चित्र निर्माण करण्यात आले. मात्र, काही वेळातच दबा धरून बसलेल्या आरोपींनी अचानक पवनवर धारदार शस्त्रांनी हल्ला चढविला. त्याला वाचविण्यासाठी पुढे सरसावलेल्या अमन काळे याच्यावरही वार करण्यात आले. हल्ल्यामुळे घाबरलेल्या अजय सोळंकीने घटनास्थळावरून पळ काढत स्वतःचा जीव वाचविला. रक्तबंबाळ अवस्थेतील पवनला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याची प्राणज्योत मालवली. घटनेनंतर हुडकेश्वर पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदवून तपासाची चक्रे फिरविली आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटील आणि पोलिस उपायुक्त रश्मीता राव यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाचा आढावा घेतला.

### होती शंका, अखेर तसेच घडले!

मागील तीन महिन्यांपुर्वी क्षुल्लक कारणावरून दोघांमध्ये ज्ञानेश्वर नगर प्रवेशव्दार, मानेवाडा रोड येथे भांडण झाले होते. यावेळी अमनला डोक्याला दुखापत झालेली होती. तेव्हापासून अशाप्रकारची घटना घडेल अशी शंका परिसरात व्यक्त करण्यात येत होती. अखेर ती शंका आज खरीच ठरली.

पोलिस निरीक्षक अनामिका मिर्झापूरे यांच्या मार्गदर्शनाखाली घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक पुरावे आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींचा शोध सुरू असून, काही संशयितांची चौकशी सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

प्राथमिक तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, सुमारे तीन महिन्यांपूर्वी दुचाकीचा कट लागल्याच्या कारणावरून पवन सूर्यवंशी आणि अमन चौरसिया यांच्यात वाद झाला होता. त्यावेळी पवनने अमनवर धारदार शस्त्राने हल्ला केल्याचा गुन्हा अजनी पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला होता. त्यानंतर दोन्ही गटांमध्ये समेट घडवून आणण्याचे अनेक प्रयत्न झाले; मात्र मनातील वैमनस्य कायम राहिल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

जुन्या वादाचा बदला घेण्यासाठी अमनचा भाऊ कुणाल ऊर्फ काका चौरसिया याने साथीदारांसह कट रचल्याचा पोलिसांना संशय आहे. वेदांत कापसे याच्या माध्यमातून पवनला पुन्हा चर्चेसाठी बोलावण्यात आले. मात्र, चर्चा सुरू असल्याचा आभास निर्माण करून त्याच्यावर अचानक जीवघेणा हल्ला करण्यात आल्याचे तपासातून समोर येत आहे. या कटात आणखी कोणाचा सहभाग होता, याचाही पोलिस सखोल तपास करीत आहेत.

## 'गजर विठ्ठल नामाचा'ने नागपूरकर रसिक झाले भक्तिरसात चिंब



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठल भक्तिरसात चिंब करणारा 'गजर विठ्ठल नामाचा'हा भक्तिमय गीतांचा कार्यक्रम



शुक्रवारी रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला रसिक प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महापौर नीता ठाकरे, आमदार प्रवीण दटके, माजी आमदार प्रा. अनिल सोले, आमदार सुधाकर कोहळे, नगरसेविका सारिका नांदुरकर, नगरसेविका प्रमीला गौर, डॉ. उपेंद्र कोठेकर, आशिष वांदिले, सुधीर दिवे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. सांस्कृतिक मंत्रालयातर्फे वसंत खडसे आणि रूपेश गायधने यांची उपस्थिती होती. 'जय जय राम कृष्ण हरी'च्या गजराने कार्यक्रमाला भक्तीमय सुरुवात झाली. मंजिरी वैद्य अय्यर यांच्या 'अमृताहुनी गोड' या गीताने भक्तिमय वातावरण निर्माण केले. राष्ट्रीय पुरस्कार विजेती पार्श्वगायिका सावनी रवींद्र यांनी 'मोगरा फुलला', 'सुंदर ते ध्यान', 'रंगा येई वो', 'भेटी लागी जीवा', 'कानडाऊ विठ्ठलू', 'रुणूझुणू रुणूझुणू', 'अवचिता परिमळू' यांसारखी भक्तिगीते सादर करत रसिकांना मंत्रमुग्ध केले. या भक्तिमय गीतांमधून सभागृहात विठ्ठलनामाचा गजर दुमदुमला आणि रसिक प्रेक्षक विठ्ठलाच्या नामात नाहून निघाले.

सारेगमप फेम अभिषेक मारोटकर यांनी 'रुपे सुंदर', 'अबीर गुलाल', 'येई वो विठ्ठले', 'बघा उघडूनी दार', 'माऊली माऊली' ही गाणी सादर केली. इंडियन आयडल फेम ऋषिकेश करमरकर यांनी 'ध्याणीयांचा राजा', 'वेढा वेढा' या गाण्याला वन्स मोअर ची दाद दीली. 'तीर्थ विठ्ठल', 'कानडा राजा' या गीतांनी रसिकांची मने जिंकली. मंजिरी वैद्य अय्यर यांनी 'ये गं ये गं', 'पांढुरंग नामी', 'विश्वाचे आर्त', 'या पंढरीचे सुख' या गीतांचे सादरीकरण केले. वाद्यवृंदावर परिमल जोशी, अशोक टोकलवार, यथार्थ टोकलवार, श्रीधर हरले, तुषार विघ्ने, राहुल मानेकर, शिवलाल यादव, निशिकांत देशमुख उत्तम साथसंगत केली.

हा कार्यक्रम सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार यांच्या मार्गदर्शनात व आमदार प्रवीण दटके यांची संकल्पनेतून साकारला. निवेदनाची धुरा किशोर गलांडे यांनी उत्तमरीत्या सांभाळली. कार्यक्रमाचे संयोजन कुणाल गडेकर तर संगीत संयोजन परिमल जोशी यांचे होते. सुनील हामदापुरे, विशाल यादव, हर्षल पराते यांचे तांत्रिक सहकार्य लाभले. मयुरी पात्रे यांनी सुरेख रांगोळी काढली.

## गुरुपौर्णिमा कीर्तन महोत्सवाला आजपासून प्रारंभ

### स्व. प्राचार्य डॉ. दिलीप डबीर यांच्या पाच शिष्यांची कीर्तनसेवा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** राष्ट्रीय कीर्तनरत्न म्हणून ख्याती लाभलेले तसेच शेकडो कीर्तनकार घडविणारे स्वर्गीय प्राचार्य डॉ. दिलीप डबीर यांच्या शिष्यपरिवारातर्फे गुरुपौर्णिमा कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. नरेंद्र नगर येथील गणेश मंदिरात रविवार, २६ जुलैपासून सुरू होणारा हा महोत्सव पाच दिवस चालणार असून, दररोज सायंकाळी ६ ते ८ या वेळेत स्व. डॉ. डबीर यांनी घडविलेल्या पाच शिष्यांची कीर्तने सादर केली जाणार आहेत. रविवार, २६ जुलै रोजी उद्घाटन समारंभानंतर शिष्यपरिवारातर्फे नारदस्तवन सादर होईल आणि त्यानंतर महोत्सवाला प्रारंभ होईल. पहिल्या दिवशी ह.भ.प. संगीता देशपांडे यांचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर सोमवार, २७ जुलै रोजी ह.भ.प. प्रज्ञा कुलकर्णी, मंगळवार, २८ जुलै रोजी ह.भ.प. आदित्य देशकर, बुधवार, २९ जुलै रोजी ह.भ.प. विश्वास पाचपोर यांची कीर्तने होतील. गुरुवार, ३० जुलै रोजी ह.भ.प. मृण्मयी कुळकर्णी यांच्या समारोपीय कीर्तनाने महोत्सवाची सांगता होईल.

या कीर्तन महोत्सवाचे हे तिसरे वर्ष असून, यंदा नरेंद्र नगर येथील गणेश मंदिर न्यासाच्या संयुक्त विद्यमाने त्याचे आयोजन करण्यात आले आहे. स्व. प्राचार्य डॉ. दिलीप डबीर हे आर. एस. मुंडले धरमपेठ कला-वाणिज्य महाविद्यालयातील मराठी भाषा व साहित्य विभागाचे प्रमुख म्हणून कार्यरत होते. मराठी कीर्तनकला आणि साहित्य हा त्यांच्या पीएच.डी. प्रबंधाचा विषय होता. सन १९७६ मध्ये प्रतापगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील त्यांच्या कीर्तनाने प्रभावित होऊन शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी त्यांना 'शिवभक्तीपरायण' ही उपाधी प्रदान केली होती. तसेच १९८५ मध्ये धनवटे रंगमंदिर, नागपूर येथे त्यांनी पहिल्या वैदर्भीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन केले. नागपूर व विदर्भात कीर्तन महोत्सवांची परंपरा रुजविण्याचे श्रेयही त्यांनाच जाते. कीर्तनशास्त्र विषयात बी.ए. आणि एम.ए. या अधिकृत पदव्यांची संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्यही डॉ. डबीर यांनी केले. या अभ्यासक्रमांतून महाराष्ट्रभर शेकडो कीर्तनकार घडले. त्यांच्या प्रेरणेतून अकोला, पुणे आणि औरंगाबाद येथे कीर्तन महाविद्यालयांची स्थापना झाली. नागपूरसह महाराष्ट्रभर त्यांनी अनेक कीर्तन महोत्सवांचे आयोजन केले आणि त्यामध्ये सक्रिय सहभाग नोंदविला.

## खापा (घु.) येथील युवकाच्या आत्महत्या प्रकरणात लहान मासे जाळ्यात, मोठे मासे मोकाट?

### प्रहार संघटनेचा परखड सवाल; केवळ दोन पोलिसांच्या बदलीने प्रकरण दडपण्याचा प्रयत्न?

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

खापा (घु.) येथील युवक भगवान किसना मानमोडे यांच्या आत्महत्या प्रकरणात कारवाईच्या नावाखाली केवळ कनिष्ठ पोलीस कर्मचाऱ्यांवर कारवाई करून वरिष्ठ अधिकाऱ्यांना अभय दिले जात असल्याचा आरोप प्रहार संघटनेने केला आहे. या प्रकरणात दोन पोलीस कर्मचाऱ्यांची नागपूर येथील कार्यालयात उचलबांगडी करण्यात आली असली, तरी या संपूर्ण प्रकरणातील मुख्य जबाबदार अधिकारी अद्यापही मोकाट असल्याचा परखड सवाल प्रहारने उपस्थित केला आहे.



प्रहार संघटनेचे काटोल-नरखेड विधानसभा प्रमुख दिनेश निंबाळकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भगवान मानमोडे यांच्यावर झालेल्या कथित मारहाणीबाबत अनेक गंभीर आरोप समोर आले आहेत. मात्र, आजपर्यंत या प्रकरणात केवळ कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात आली असून, संपूर्ण कारवाईचे आदेश देणारे किंवा घटनाक्रमात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

प्रहारने प्रश्न उपस्थित केला आहे की, "लहान मासे जाळ्यात अडकले; पण मोठे मासे अजूनही बाहेरच का?" केवळ बदली किंवा उचलबांगडी ही कारवाई नसून, दोषी अधिकाऱ्यांवर विभागीय चौकशी करून त्यांचेवर आत्महत्येस प्रवृत्त करण्याचा मनुष्य वधाचा फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांचेवर बडतर्फची कारवाई करण्याची गरज असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

या प्रकरणाची चौकशी निष्पक्षपणे होत आहे का, याबाबतही प्रहार संघटनेने शंका व्यक्त केली आहे. पुरावे, सीसीटीव्ही फुटेज, कॉल रेकॉर्ड, स्टेशन डायरी आणि प्रत्यक्षदर्शींचे जबाब यांची सखोल तपासणी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी करण्यात आली आहे. भगवान मानमोडे यांच्या कुटुंबाला न्याय मिळावा, दोषींना कठोर शिक्षा व्हावी आणि राजकीय अथवा प्रशासकीय दबावाखाली कोणालाही पाठीशी घालू नये, अशी मागणी प्रहारने केली आहे. केवळ कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर कारवाई करून प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न झाल्यास प्रहार संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

या प्रकरणात दोन पोलीस कर्मचाऱ्यांची उचलबांगडी झाल्यानंतरही मुख्य जबाबदारांवर कारवाई न झाल्याने नागरिकांमध्येही तीव्र नाराजी असून, "खरे दोषी कोण आणि त्यांच्यावर कारवाई कधी?" हा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिकांकडूनही उपस्थित केला जात आहे.

## भरधाव ट्रकने चार जनावरांना चिरडले, चालक ताब्यात

**दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर**

चंद्रपूर - बल्लारपूर मार्गावरील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयासमोर भरधाव ट्रकच्या धडकेत चार जनावरांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना शनिवारी घडली. अपघातानंतर ट्रकसह पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या चालकाला सतर्क नागरिकांनी पाठलाग करून पकडले आणि शहर पोलिसांच्या ताब्यात दिले. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.



मिळालेल्या माहितीनुसार, एपी ३९ यूयू ६६७९ क्रमांकाचा ट्रक बल्लारपूरहून चंद्रपूरच्या दिशेने येत होता. चंद्रपूर शहरापासून सुमारे सहा किलोमीटर अंतरावर असलेल्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालया समोरील उताराच्या रस्त्यावर ट्रकने रस्त्यावर असलेल्या चार जनावरांना जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की चारही जनावरांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

अपघातानंतर चालकाने ट्रकसह घटनास्थळावरून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, उपस्थित नागरिकांनी तत्काळ त्याचा पाठलाग करून सुमारे ५०० मीटर अंतरावर ट्रक अडविला. चालकाला पकडून शहर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी मृत जनावरांचा पंचनामा करून आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली. त्यानंतर मृत जनावरांवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

शहर पोलिसांनी सांगितले की, नागरिकांनी पकडून दिलेल्या चालकाला पोलीस ठाण्यात ठेवण्यात आले आहे. ट्रकचा मालक आंध्र प्रदेश येथील असून, त्याच्या उपस्थितीनंतर जनावरांच्या नुकसान भरपाईबाबत पुढील निर्णय घेण्यात येणार आहे. या प्रकरणाचा अधिक तपास शहर पोलीस करीत आहेत.

**उतारामुळे वाढतो अपघातांचा धोका**

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयासमोरील रस्ता उताराचा असल्याने बल्लारपूरकडून येणाऱ्या वाहनांचा वेग अनेकदा नियंत्रणाबाहेर जात असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.

**थोडक्यात**

### आषाढी एकादशी निमित्ताने अहिल्या किड्स प्री-प्रायमरी स्कूलमध्ये उत्साहात वारी-दिंडी



**दै. सिंहवाणी वृत्त, हिंगणा**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त हिंगणा येथील अहिल्या किड्स प्री- प्रायमरी स्कूलमध्ये पारंपरिक वारी-दिंडीचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी वारकरी संप्रदायाची वेशभूषा परिधान करून विठ्ठलभक्तीचा अनोखा आविष्कार सादर केला. टाळ, मृदुंग, भगवे ध्वज, तुळशी वृंदावन आणि पालखीच्या सहभागाने काढण्यात आलेल्या दिंडीत विद्यार्थ्यांनी "ज्ञानोबा-तुकाराम", "पांडुरंग हरी विठ्ठल" अशा नामघोषाने परिसर भक्तिमय केला. विठ्ठल-रुक्मिणी, संत आणि वारकरी यांच्या वेशभूषेतील चिमुकल्यांनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. यावेळी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व, वारकरी संप्रदायाची परंपरा, संतांचे विचार, भक्ती, संस्कार, एकता आणि सामाजिक मूल्यांची माहिती सोप्या भाषेत देण्यात आली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची आणि भारतीय संस्कृतीची अनुभवातून ओळख झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे संचालक मंडळ, मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. पालकांनीही विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाचे कौतुक करत शाळेच्या या संस्कारक्षम उपक्रमाचे स्वागत केले. आनंद, भक्ती आणि संस्कारमय वातावरणात संपन्न झालेल्या या वारी- दिंडीने आषाढी एकादशीचा उत्सव अविस्मरणीय ठरला.

### खापरखेडा तेली ते पारडीखुर्द पर्यायी पूल वाहल्यामुळे बंद असलेली वाहतूक आज रविवार पासून सुरू होणार: सुपरवायझर शबीर मडावी



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

तीन दिवसांपूर्वी सुरू असलेल्या सततधार पावसाने खापरखेडा तेली ते पारडीखुर्द दरम्यान नाल्यावरील पर्यायी पूल बुधवार (ता. २२ जुलै)ला वाहून गेलेला होता. त्यामुळे वाहतूक पूर्णपणे बंद होती. दोन दिवसापासून पावसाने विश्रांती घेतल्याने संबंधित कंत्राटदाराने वाहलेला पर्यायी पूल दुरुस्त करण्यासाठी व जुन्या पुलाच्या ठिकाणी नवीन पुलाचे शेवटच्या टप्प्यावरील बांधकाम युद्ध स्तरावर सुरू केल्याने उद्या रविवार (ता. २६ जुलै) सकाळपासून वाहतूक सुरू होणार असल्याचे आज शनिवार (ता. २५ जुलै)ला संबंधित रस्त्याचे कंत्राटदाराचे सुपरवायझर शबीर मडावी यांनी दुपारी तीनच्या दरम्यान प्रत्यक्ष स्थळावर भेट देऊन विचारपूस केली असता सांगितले.

### रस्ते अपघात टाळण्यासाठी रहदारीचे नियम पाळा: पोलीस निरीक्षक सुभाष बारसे

**दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर**

आजच्या धडपडीच्या युगात रस्त्यावरून वाहन चालवताना अपघाताचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून रस्त्यात झालेल्या



वाहन अपघातात अनेकांना आपले जिव गमवावे लागते तर अनेकांना कायमचे अपंगत्व स्वीकारावे लागते त्यासाठी जनतेने रहदारीचे नियम पाळणे अत्यंत आवश्यक आहे.

कोणतेही वाहन चालवत असताना गुंगीकारक पदार्थ किंवा दारूचे सेवन करून वाहन चालवणे टाळा, टू व्हीलर चालवत असताना हेल्मेट चा वापर करा आणि फोरव्हीलर चालवीत असताना सीट बेल्ट लावा तसेच कोणतेही वाहन चालवत असताना मोबाईलचा वापर करू नका, किती घाई असेल तरी वेग मर्यादेचे पालन करा. या सर्व नियमाचे पालन केल्यास अपघात होण्यापासून बचाव होऊ शकतो, रहदारीचे नियम हे पोलीस चालान करतात म्हणून नाहीतर आपल्या सुरक्षेसाठी आणि आपल्या कुटुंबासाठी नियमाचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. वाहन चालवताना नेहमी एक गोष्ट लक्षात असली पाहिजे की आपले कुटुंब घरी वाट पाहत आहेत म्हणून रहदारीचे नियम पाळणे आवश्यक आहे असे आवाहन तुमसर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुभाष बारसे यांनी जनतेला केले आहे.

### अरोली येथे आषाढी एकादशी निमित्त वृक्षारोपण व विठ्ठलाची वारी



**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

शनिवार (ता. २५ जुलै)ला समर्थ रामदास हायस्कूल अरोली येथील शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी मिळून विठ्ठलाच्या वारीचे अगदी सुंदर नियोजन केले व गावामध्ये वारीच्या माध्यमातून भक्तिमय वातावरण तयार करण्यात केले. तसेच चैतन्येश्वर पार्वती मंदिर परिसरात वृक्षारोपणही करण्यात आले. या दोन्ही कार्यक्रमाला सरपंच रोशनी प्रशांत भुरे, शिवसेना तालुकाप्रमुख प्रशांत भुरे, शाळेचे संचालक शिवाजी कुंभलकर, मुख्याध्यापक बडवाईक, तंटामुक्त अध्यक्ष कैलास समरीत सह शाळेतील शिक्षकवृंद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी शाळेतील मुलांना खाऊचे वाटपही करण्यात आले.

थोडक्यात

## लोकनेते अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त चार दिवसीय जनसेवा शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (दक्षिण नागपूर) च्यावतीने लोकनेते तथा माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रथम जयंतीनिमित्त २२ ते २५ जुलै या दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या चार दिवसीय जनसेवा शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध शासकीय योजनांशी संबंधित सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देत हजारो नागरिकांना लाभ देण्यात आला. शिबिरामध्ये ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. तसेच ९० बालकांचे आधार अपडेट, ८८ विद्यार्थ्यांची बायोमेट्रिक नोंदणी, १६० विद्यार्थ्यांची अर्धतिकीट कार्ड प्रक्रिया, तसेच महिला व ज्येष्ठ नागरिकांसह ३८७ नागरिकांची आभा कार्ड नोंदणी करण्यात आली. याशिवाय श्रम कार्ड, मतदान ओळखपत्र, आयुष्मान भारत कार्ड, बांधकाम कामगार कार्ड आदी विविध योजनांसाठी ४३२ नागरिकांची नोंदणी करण्यात आली.

या चार दिवसांच्या शिबिराचा एकूण हजारो नागरिकांनी लाभ घेतला. शिबिराच्या समारोपप्रसंगी आयोजकांनी लोकनेते अजितदादा पवार यांच्या जनहितवादी विचारसरणीचा वारसा पुढे नेत समाजहितासाठी कार्य सुरूच ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. या जनसेवा शिबिराचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष अनिल अहिरकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्याध्यक्ष श्रीकांत शिवणकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून राजाभाऊ टाकसाळे, सभापती राजुभाऊ नागुलवार, महिला अध्यक्षा रुपालीताई पिचकाटे, भोलाभाऊ पटेल, राजेश समर्थ, भूषण हरडे, नितीन ढेंगे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहरातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. चार दिवसीय जनसेवा शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी अखिलेश भुगावकर, विश्वास सेलसुरकर, रमेश कांबळे, नामदेव देशकर, राजेंद्र बालपांडे तसेच सर्व सहकारी, ज्येष्ठ नागरिक व कार्यकर्त्यांचे आभार दक्षिण नागपूर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष मुकेश रेवतकर यांनी मानले. त्यांनी यापुढेही जनतेच्या सेवेसाठी अशाच उपक्रमांचे आयोजन करण्याची ग्वाही दिली.

## प्रणाग हायस्कूल आजनगाव येथे दप्तर मुक्त शनिवार अंतर्गत दैनिक वृत्तपत्र वाचन उपक्रम

**दै. सिंहवाणी वृत्त, कोदामेंढी**

मौदा तालुक्यातील प्रणाग हायस्कूल आजनगाव येथे आज



शनिवार (ता. २५ जुलै) ला दप्तर मुक्त शनिवार अंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती विकसित करण्याच्या उद्देशाने दैनिक वृत्तपत्र वाचन उपक्रम सुरू करण्यात आला .यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका कु. शालिनी बाभूळकर यांनी विद्यार्थ्यांना वृत्तपत्र वाचनाचे महत्त्व समजावून सांगितले. नियमित वृत्तपत्र वाचनामुळे सामान्य ज्ञान, भाषिक कौशल्य, विचारशक्ती आणि चालू घडामोडींची माहिती वाढण्यास मदत होते. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी दररोज शाळेतील वृत्तपत्राचे वाचन करून ज्ञानात भर घालावी असे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त प्रतिसाद देत नियमित वृत्तपत्र वाचनाच्या संकल्प केला. सदर कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

## दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जच्या निषेधार्थ नागपुरात भीम आर्मीचे आंदोलन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दिल्ली येथील जंतर- मंतर येथे विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ भीम आर्मी भारत एकता मिशन, नागपूर जिल्ह्याच्या वतीने संविधान चौक येथे भव्य व शांततापूर्ण आंदोलन करण्यात आले. आंदोलनात ५०० हून अधिक विद्यार्थी, पालक, महिला, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. यावेळी आंदोलकांनी विद्यार्थ्यांवरील कथित अन्यायाचा तीव्र निषेध व्यक्त करत संबंधित घटनेची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच विद्यार्थ्यांच्या घटनात्मक अधिकारांचे संरक्षण करण्यात यावे आणि त्यांना न्याय मिळावा, अशी मागणी करण्यात आली. आंदोलनानंतर भारताच्या महामहिम राष्ट्रपती यांच्या नावे नागपूर जिल्हाधिकाऱ्यां मार्फत निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात विद्यार्थ्यांवरील कारवाईची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याबरोबरच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. या आंदोलनात भीम आर्मी भारत एकता मिशनच्या नागपूर जिल्हा महिला अध्यक्षा नेहा राऊत, जिल्हा महिला वरिष्ठ उपाध्यक्षा डॉ. वंदना इंगळे, शीला वासनिक, जिल्हा सचिव राहुल जगताप, उपाध्यक्ष संघरत्न गेडाम, आकाश गजभिये, माया पाटील, शेखर उके, शखिल मदारी तसेच संघटनेचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण आंदोलन शांततापूर्ण व शिस्तबद्ध पार पडले.

# संतसाहित्यातील भक्तिरसाने न्हाऊन निघाला 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' संगीतमय सोहळा

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

सोहम कलाविष्कार, नागपूर यांच्या वतीने संत साहित्य, अभंग आणि भक्तिरचनांच्या सुरेल मैफलीने सजलेला 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' हा विशेष संगीतमय कार्यक्रम गुरुवारी सायंटिफिक सोसायटी सभागृहात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. भक्तिरस, संगीत आणि संतवाङ्मयाचा अनोखा संगम अनुभवण्यासाठी उपस्थित रसिकांनी सभागृहात मोठी गर्दी केली होती.

श्री स्वामी मठ, मालवीय नगरचे अध्यक्ष अजय खोलापूरकर, संस्कार भारती विदर्भ प्रांताचे उपाध्यक्ष व ज्येष्ठ गायक श्याम देशपांडे, सुप्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर, एम. एम. असोसिएट्सच्या संचालिका कांचन रानडे तसेच रोटरी क्लब ऑफ नागपूर वेस्टच्या अध्यक्ष भाग्यलक्ष्मी राजन यांची प्रमुख उपस्थिती होती.




सुरूवातीला निधी रानडे यांच्या 'सुंदर ते ध्यान' या गाण्याने भक्तिमय वातावरण निर्माण केले. त्यानंतर संगीत मैफलीत मंजिरी वैद्य अय्यर यांनी 'सुखाचे जे सुख', 'कमोदिनी का जाणे', 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' आणि 'धांव आली आई' या रचनांनी भक्तिमय वातावरणाची सुरुवात केली. मुकुल पांडे यांनी 'वेढा वेढा रे पंढरी', 'माझे माहेर पंढरी', 'विठू माऊली' आणि 'वृंदावनी वेणू' या अभंगांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. निधी रानडे 'भेटी लागी जीवा', 'खेळ मांडियेला' आणि 'अवघा रंग एक झाला' या रचना सादर करून भक्तिरस अधिक खुलवला. अक्षय चारभाई यांनी 'विठ्ठल आवडी', 'अरे कृष्णा', 'हरी म्हणा' आणि 'येथे का रे उभा' या सादरीकरणातून प्रभावी स्वरांची अनुभूती दिली. आकांक्षा चारभाई यांनी 'पांडुरंग कांती', 'विठाई किठाई', 'पांडुरंग नामी' आणि 'बोलावं विठ्ठल' या भक्तिगीतांनी कार्यक्रमाची सांगता अविस्मरणीय केली.

कार्यक्रमाला श्रीकांत पिसे, आर्य पुराणकर, वेद ढोक, आशीष गायधन, आदित्य गोगटे आणि सोहम रानडे यांनी वाद्यसंगतीची उत्कृष्ट साथ दिली. कार्यक्रमाचे संयोजन स्नेहल रानडे यांचे होते तर संकल्पना गजानन रानडे यांची होती. नृत्य संयोजन वृषाली साठे यांनी केले, तर स्मिता महान आणि देवव्रत देशपांडे यांनी आपल्या प्रभावी व ओघवत्या शैलीत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

या संगीतमय सोहळ्यास विको लेबोरेटरीज, एम. एम. असोसिएट्स आणि रोटरी क्लब ऑफ नागपूर वेस्ट यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# चिमुकल्यांच्या वारकरी दिंडीने जलालखेडा भक्तिरसात न्हाऊन निघाले

### गुरुकुल पब्लिक स्कूलचा संस्कारक्षम उपक्रम, संतपरंपरेचा वारसा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त गुरुकुल पब्लिक स्कूल, जलालखेडा येथे आयोजित करण्यात आलेल्या वारकरी दिंडीने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषात, टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि "ज्ञानोबा-तुकाराम"च्या नामस्मरणात निघालेल्या चिमुकल्यांच्या दिंडीने जलालखेडा शहरातील नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. शिस्तबद्ध रांग, आकर्षक वेशभूषा आणि भक्तिभावाने भारावलेल्या विद्यार्थ्यांमुळे हा उपक्रम शहराचे प्रमुख आकर्षण ठरला.

यावेळी प्री-प्रायमरी व प्रायमरी विभागातील विद्यार्थ्यांनी विठ्ठल-



रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत सावता माळी, संत एकनाथ महाराज, संत जनाबाई, संत चोखामेळा, संत मुक्ताबाई आदी संतांच्या वेशभूषेत सहभाग घेत वारकरी संप्रदायाची परंपरा साकारली. विद्यार्थ्यांच्या हातात भगवे ध्वज, तुळशीची रोपे, टाळ, वीणा आणि दिंडीची पताका असल्याने संपूर्ण वातावरण पंढरपूरच्या वारीची अनुभूती देणारे झाले होते. महाराष्ट्र ही संतांची भूमी असून संतांच्या विचारातून समाजाला समता, बंधुता, सेवा, मानवता आणि भक्तीचा संदेश मिळाला आहे. आधुनिक शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, नैतिक मूल्ये, धार्मिक सहिष्णुता आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण व्हावी, या उद्देशाने शाळेने हा संस्कारक्षम उपक्रम राबविला. लहान वयातच विद्यार्थ्यांना वारकरी परंपरेची ओळख करून देत संतांच्या शिकवणीचे महत्त्व प्रत्यक्ष कृतीतून पटवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

दिंडीची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिका प्रतिभा दंढारे मॅडम, वरिष्ठ शिक्षिका सरला भोगे आणि सहाय्यक शिक्षिका चित्रा ढोकणे यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी अभंग, हरिपाठ, विठ्ठलनामाचा अखंड गजर आणि "ज्ञानोबा-तुकाराम"च्या जयघोषात दिंडी काढली. परिसरातील नागरिकांनी दिंडीचे ठिकठिकाणी स्वागत करत चिमुकल्यांवर पुष्पवृष्टी केली. अनेक पालकांनी या उपक्रमाचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे मुलांमध्ये संस्कार आणि संस्कृतीची जपणूक होत असल्याची भावना व्यक्त केली. यावेळी विद्यार्थ्यांनी विठ्ठलभक्तीवरील अभंग आणि भक्तिगीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. दिंडीदरम्यान स्वच्छता, शिस्त, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक एकतेचा संदेशही विद्यार्थ्यांनी दिला. त्यामुळे हा उपक्रम केवळ धार्मिक न राहता सामाजिक प्रबोधनाचाही संदेश देणारा ठरला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका विजया नासरे मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका प्रतिभा दंढारे, कविता कळंबे, प्रियांका बनाईत, कुमुद कडू, तृप्ती धर्मे, जयश्री पेठे यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या वारकरी दिंडीने विद्यार्थ्यांमध्ये भक्ती, संस्कार आणि संतपरंपरेबद्दल आदराची भावना रुजविण्याबरोबरच गुरुकुल पब्लिक स्कूलच्या सामाजिक व सांस्कृतिक बांधिलकीचीही प्रचिती घडवून दिली.

# सुधीर मुनगंटीवार फॅन्स क्लबतर्फे विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर**

जनसेवा हीच ईश्वरसेवा हे ब्रीद जपणारी समाजसेवी संस्था तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या "शिक्षण हे वाघिणीचे दूध आह, जो जेवढे प्राशन करेल तेवढा दहाडेल" या प्रेरणादायी विचाराला अनुसरून, महाराष्ट्राचे लोकनेते, विकासपुरुष, सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामीण भागातील ५०० हून अधिक विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक डझन वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून सपना सुधीर मुनगंटीवार उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व, मेहनत, शिस्त आणि उज्ज्वल




भविष्यासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन केले तसेच सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभाशीर्वाद दिले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष मा. हरीश शर्मा, ज्येष्ठ नेते व वरिष्ठ पत्रकार तथा सिनेट सदस्य समीर भाऊ केन , ज्येष्ठ नेते निलेश भाऊ खरबडे, भारतीय जनता पक्षाचे संघटन मंत्री मनीष पांडे, माजी शहराध्यक्ष काशीनाथ सिंह, चिंतामणी शाळेचे प्राध्यापक प्रशांत दंतुलवार, वरिष्ठ पत्रकार श्रीनिवास कंदुपुरी, भारतीय जनता पक्षाचे नेते श्रीनिवास चिरकुटावार, ज्येष्ठ नेते संजय मोपीडवार, प्रसिद्ध व्यापारी मुन्नाभाई ठाकूर, ग्रामीण अध्यक्ष पिंटू भाऊ देऊळकर, भारतीय जनता पक्षाचे युवा नेते रोहित टोकल, तसेच सर्व शाळांचे शिक्षकवृंद उपस्थित होते.

यावेळी सुधीरभाऊ मुनगंटीवार फॅन्स क्लब, बल्लारपूर चे अध्यक्ष श्रीकांत आंबेकर, सचिव शशिकांत मुंडे तसेच संस्थेचे वरिष्ठ सदस्य सुनील यादव, उपाध्यक्ष आकाश चौधरी, सुधाकर सिक्का, कोषाध्यक्ष कमल वर्मा, कोषाध्यक्ष विनोद कोवे, सहसचिव मनोज धामणगे, मिलाप, रमेश बानो, आदर्श पोतलावार, शुभम जंगम, मंजीत आणि संस्थेचे सर्व सदस्य व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी प्रेरणादायी ठरला असून, समाजहिताच्या कार्यात संस्थेची बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

## आषाढी एकादशी निमित्त विठ्ठल मंदिरात भाविकांची गर्दी



**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**

आषाढी एकादशी निमित्ताने वाडी परिसरातील प्रभाग क्र.१,कोहळे ले आऊट येथे असलेल्या एकमेव विठ्ठल रुक्मिणी मंदिरात विठोबाचे दर्शन घेण्यासाठी वारकरी संप्रदायातील भाविकांची गर्दी उसळली होती. सर्वप्रथम सकाळी प्रभाग क्र.च्या नगरसेविका संगीता बावणे यांच्या प्रमुख उपस्थितीत महिला भजन मंडळ तर्फे पूजा-अर्चना संपन्न झाली. यावेळी मंडळच्या पदाधिकारी देवकाबाई रोकडे, कामीना रागीट, मनीषा आगलावे, सामाजिक कार्यकर्ते गुरुदास बावणे उपस्थित होते. वारकरी संप्रदायात आषाढी एकादशीला अनन्य साधारण असे महत्व आहे. विठोबाचे दर्शन म्हणजे भाविकांचे जीव की प्राण. 'विठ्ठल विठ्ठल- जय हरी विठ्ठल च्या गजरात,टाळ मृदुंगाच्या तालावर ज्येष्ठ महिलांनी फुगडी खेळून विठोबा प्रती असलेली भक्ती प्रकट केली.दर्शनासाठी दिवसभर भाविकांची रिघ बघायला मिळाली.यावेळी क्र.१च्या नगरसेविका संगीता बावणे यांनी सर्व महिला व पुरुष भाविकांचे स्वागत केले.दिवसभर सुरू असलेल्या भजन मंडळात चंद्रकला शेळकी, आशा मंगलकर, संगीता वैद्य, वनिता शेळकी, प्रिया सिंग, शारदा आगलावे, वनिता शेळकी इत्यादी महिलानी सहभाग घेतला होता.

# प्रहार मिलिटरी स्कूलमध्ये कारगिल विजय दिन उत्साहात, वीर जवानांच्या शौर्याला भावपूर्ण सलाम

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

प्रहार मिलिटरी स्कूल, रविनगर येथे कारगिल विजय दिन देशभक्ती, शौर्य आणि राष्ट्राभिमानाच्या प्रेरणादायी वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. २६ जुलै १९९९ रोजी भारतीय सैन्याने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अद्वितीय शौर्य गाजवत कारगिल युद्धात मिळवलेल्या ऐतिहासिक विजयाच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाने उपस्थितांच्या मनात देशभक्तीची भावना जागवली.

कार्यक्रमाची सुरुवात भारतमाता



पूजनाने झाली. त्यानंतर 'अमर जवान' स्मारकाला पुष्पचक्र अर्पण करून वीर शहीदांना भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. संपूर्ण परिसर देशभक्तीपर घोषणांनी आणि राष्ट्रप्रेमाच्या वातावरणाने भारावून गेला. यंदाच्या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणजे कारगिल युद्धात प्रत्यक्ष सहभागी झालेले शौर्यवंत ब्रिगेडियर सुनील गावपांडे (निवृत्त) आणि कर्नल राजू पाटील (निवृत्त) यांची प्रेरणादायी उपस्थिती लाभली. त्यांनी विद्यार्थ्यांना कारगिल युद्धाचे अनुभव अत्यंत प्रभावी आणि हृदयस्पर्शी शैलीत मांडले. त्यांच्या मनोगतातून भारतीय सैनिकांचे शौर्य, कर्तव्यनिष्ठा, त्याग आणि मातृभूमीप्रती असलेले निस्सीम प्रेम यांचे जिवंत दर्शन घडले.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लेफ्टनंट कर्नल सिद्धार्थ यांची उपस्थिती लाभली. तसेच सी.पी.अँड बेरार एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अ‍ॅड. अशोक बन्सोड, उपाध्यक्ष भालचंद्र कागभट, सचिव विजय कागभट तसेच शाळेच्या प्राचार्या श्रीमती वंदना कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. कारगिल विजय सप्ताह निमित्त संपूर्ण आठवडाभर विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये कारगिल विजयावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा, सायटेशन लेखन, स्लाईड शो आदी उपक्रमांचा समावेश होता. या उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर गीतांनी उपस्थितांना भारावून टाकले. त्यानंतर सादर करण्यात आलेले देशभक्तीपर नृत्य, योगा आणि कराटे प्रत्यक्षिकाचे सादरीकरण यांना उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. टाळ्यांचा कडकडाट आणि भारतमातेच्या जयघोषाने संपूर्ण सभागृह दुमदुमून गेले. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना दृढ करणे, भारतीय सैन्याविषयी आदर निर्माण करणे, लष्करी सेवेची प्रेरणा देणे आणि वीर जवानांच्या अतुलनीय बलिदानाचे स्मरण करून त्यांना अभिवादन करणे, हा कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असून तो प्रभावीपणे साध्य झाला.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका मृणाल काटे यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची गौरवपूर्ण सांगता करण्यात आली. याप्रसंगी सी.पी.अँड बेरार एज्युकेशन सोसायटी अंतर्गत येणाऱ्या सर्व शाळांचे प्राचार्य, शिक्षकवृंद व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी वीर जवानांच्या शौयार्ला कृतज्ञतापूर्वक अभिवादन करत त्यांच्या बलिदानाप्रती आदर व्यक्त केला.

थोडक्यात

# पिंपळगाव राऊतला अखेर हक्काचे स्वस्त धान्य दुकान

### तीन किलोमीटरवरील गावातून धान्य आणण्याची नागरिकांची फरफट थांबणार; आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील पिंपळगाव राऊत येथील नागरिकांची अनेक वर्षांची प्रतीक्षा अखेर संपुष्टात आली असून, समता बचत गट संचालित नवीन स्वस्त धान्य दुकानाचे उद्घाटन आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. गावात आजपर्यंत स्वस्त धान्य दुकान नसल्याने शिधापत्रिकाधारकांना सुमारे तीन किलोमीटर अंतरावरील दुसऱ्या गावात जाऊन धान्य आणावे लागत होते. त्यामुळे विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक व दिव्यांगांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. गावातच स्वस्त धान्य दुकान सुरू झाल्याने आता शेकडो लाभार्थ्यांची गैरसोय दूर होणार असून, शासनाच्या अन्नसुरक्षा योजनेचा लाभ वेळेत आणि सहज उपलब्ध होणार आहे. या उपक्रमाबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत लोकप्रतिनिधींचे आभार मानले.

यावेळी आमदार चरणसिंग ठाकूर यांनी सांगितले की, "शासनाच्या कल्याणकारी योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे हेच आमचे ध्येय आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी शासन कटिबद्ध आहे. स्वस्त धान्य दुकानामुळे पिंपळगाव राऊतच्या नागरिकांची अनेक वर्षांची अडचण दूर झाली आहे." या कार्यक्रमाला सौ. निलिमा सतीश रेवतकर (सदस्य, दक्षता समिती तथा महामंत्री, भाजप नागपूर जिल्हा), माजी सभापती पंचायत समिती काटोल संदीप सरोदे, भाजप नागपूर जिल्हा उपाध्यक्ष चंद्रशेखर चिखले, माजी उपाध्यक्ष नगरपरिषद मारोतराव बोरकर, सरपंच दर्शनाताई वानखेडे, उपसरपंच मोहन निंबाळकर, माजी सभापती भाऊराव नासरे, सरपंच कुणाल ढबाले, मनोहर राऊत, समता बचत गटाचे पदाधिकारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात समता बचत गटाच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. लाभार्थ्यांना नियमित, पारदर्शक व दजेदार धान्य वितरण करण्याचा संकल्पही यावेळी व्यक्त करण्यात आला. उद्घाटनानंतर आमदार चरणसिंग ठाकूर यांनी दुकानाची पाहणी करून वितरण व्यवस्थेची माहिती घेतली. गावात प्रथमच स्वस्त धान्य दुकान सुरू झाल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, यापुढे धान्यासाठी तीन किलोमीटरची पायपीट करावी लागणार नसल्याने हा निर्णय ग्रामस्थांसाठी मोठा दिलासा ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## प्रशिक्षणानंतरही बँक कर्जासाठी हेलपाटे, सालेकसातील सुशिक्षित बेरोजगारांची व्यथा



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा- राजु फुंडे**

केंद्र व राज्य शासनामार्फत सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना स्वयंरोजगारासाठी विविध कर्ज योजना राबविल्या जातात. तसेच उद्योग विभागामार्फत उद्योजकता विकास प्रशिक्षण देऊन प्रशिक्षण पूर्ण केलेल्यांना प्रमाणपत्रही दिले जाते. या योजनांचा उद्देश बेरोजगारांना स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी आर्थिक मदत उपलब्ध करून देणे हा आहे. मात्र सालेकसा तालुक्यात अनेक लाभार्थ्यांचा आरोप आहे की, प्रशिक्षण पूर्ण करून आवश्यक कागदपत्रे सादर केल्यानंतरही काही बँकांकडून कर्ज मंजुरीसाठी विलंब होत असून, अर्जदारांना वारंवार बँकेच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत. त्यामुळे शासनाच्या स्वयंरोजगार योजनांचा अपेक्षित लाभ अनेक पात्र युवकांपर्यंत पोहोचत नसल्याची भावना व्यक्त केली जात आहे. उद्योग विभागाकडून प्रशिक्षण घेऊन प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या उमेदवारांचे म्हणणे आहे की, शासनाने त्यांना व्यवसायासाठी प्रोत्साहन दिले असले तरी प्रत्यक्षात बँक स्तरावर कर्ज प्रक्रियेत अडथळे निर्माण होत असल्याने व्यवसाय सुरू करण्याचे स्वप्न अपूर्ण राहत आहे. वेळेत कर्ज न मिळाल्यामुळे अनेकांना रोजगाराच्या संधी गमवाव्या लागत असल्याचाही दावा काही लाभार्थ्यांनी केला आहे.

तज्ज्ञांच्या मते, शासनाच्या विविध स्वयंरोजगार योजनांमध्ये पात्र अर्जदारांचे प्रस्ताव नियमांनुसार तपासून बँकांनी निर्णय देणे अपेक्षित असते. प्रत्येक अर्ज मंजूर करणे बंधनकारक नसले, तरी अर्ज नाकारल्यास किंवा अतिरिक्त कागदपत्रांची आवश्यकता असल्यास त्याबाबत स्पष्ट कारण लेखी स्वरूपात कळविणे आणि प्रक्रिया पारदर्शक ठेवणे आवश्यक मानले जाते. यामुळे जिल्हा उद्योग केंद्र, संबंधित बँका आणि प्रशासन यांनी समन्वय साधून पात्र लाभार्थ्यांच्या प्रकरणांचा आढावा घ्यावा, प्रलंबित अर्ज निकाली काढावेत आणि शासनाच्या योजनांचा लाभ खऱ्या अर्थाने गरजू व पात्र युवकांपर्यंत पोहोचावा, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

## विमल शहाकर यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**



विमल शहाकर यांचे वृद्धापकाळाने (८६) आज दिनांक २५ जुलै रोजी संध्याकाळी ७ वाजता निधन झाले. विमल शहाकर या गणेश मंदिर टेकडी संस्थेचे सचिव दिलीप शहाकर यांच्या मातोश्री होत्या. त्यांची अंत्ययात्रा उद्या दिनांक २६ जुलै रोजी ११.३० वाजता त्यांचे राहते घरून भाजी मंडी, बर्डी येथून मोक्षधाम, घाट रोड साठी निघेल.

# सेवानिवृत्तीनंतरही शिक्षणसेवेचा अखंड वसा, तीन शाळांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

सेवानिवृत्तीनंतरही शिक्षणाशी असलेली नाळ कायम जपत समाजाप्रती आपली बांधिलकी जपणारे नंदकिशोर गमे यांनी यावर्षीही नरखेड तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खेडी (गो. गो.), मोहखेडी व येरंडा येथील विद्यार्थ्यांना शालेय लेखन व शैक्षणिक साहित्याचे वितरण करून सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण घालून दिले.

सन २०२३ मध्ये सेवानिवृत्त झाल्यानंतर गमे यांनी दरवर्षी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य




देण्याचा उपक्रम सुरू ठेवला असून, यंदाही विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, प्रत्येकी दोन नोटबुक, दोन पेन, स्केल, पेन्सिल, शार्पनर व खोडरबराचे संच भेट देण्यात आले. नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच मिळालेल्या या साहित्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

खेडी (गो. गो.) येथील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ. नंदाताई बांदरे होत्या. कार्यक्रमाचे संचालन मुख्याध्यापक विरेंद्र वाघमारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सहाय्यक शिक्षक प्रमेध मानकर यांनी केले. मोहखेडी येथील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रप्रमुख धर्मपाल बागडे होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन मुख्याध्यापक राजेश डेहनकर यांनी केले. येरंडा येथील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा सीमाताई सर्याम होत्या. प्रमुख अतिथी म्हणून केंद्रप्रमुख राजू लेंडे व जीवन चिमोटे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन मुख्याध्यापक विनोद भोयर यांनी केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी नंदकिशोर गमे यांच्या समाजोपयोगी कार्याचे कौतुक करत, "शिक्षण हीच खरी समाजसेवा असून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अशा उपक्रमांची नितांत गरज आहे," असे मत व्यक्त केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळाल्याने पालकांवरील आर्थिक भार काही प्रमाणात हलका होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

तीनही शाळांमधील शिक्षक, पालक व ग्रामस्थांनी नंदकिशोर गमे यांचे मनःपूर्वक अभिनंदन करत, त्यांनी भविष्यातही अशाच प्रकारे विद्यार्थ्यांसाठी सेवाभावी उपक्रम राबवत राहावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. विद्यार्थ्यांनीही आनंद व्यक्त करत या उपक्रमाबद्दल त्यांचे आभार मानले.

शिक्षण क्षेत्राशी असलेली आत्मीयता आणि विद्यार्थ्यांप्रती असलेले प्रेम जपत सेवानिवृत्तीनंतरही निस्वार्थपणे सुरू असलेले नंदकिशोर गमे यांचे हे कार्य परिसरातील इतरांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

## पंढरपूर वारीत खापरखेड्यातील कंपनीच्या ड्रोनची यशस्वी कामगिरी



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

पंढरपूर वारीतील गर्दी व्यवस्थापनासाठी सोलापूर ग्रामीण पोलिसांनी खापरखेडा येथील ब्लूस्काई अमीदा प्रा. लि. मार्फत ideaForge Q6 V2 चे आठ ड्रोन आणि अँटी-ड्रोन गन प्रणाली तैनात केली. सुमारे ३० लाख वारकऱ्यांच्या उपस्थितीत २५० किलोमीटरच्या वारी मार्गावर ड्रोनद्वारे हवाई देखरेख, गदीर्चे रिअल-टाइम निरीक्षण आणि मेगाफोनद्वारे सूचना देण्यात आल्या.

ब्लूस्काई अमीदाने एआय आधारित व्हिडिओ ॲनालिटिक्सची सुविधा पुरवली, तर ideaForge BlueFire Live प्लॅटफॉर्मद्वारे थेट प्रक्षेपण व तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले. या तंत्रज्ञानामुळे सोलापूर ग्रामीण पोलिसांना गर्दी नियंत्रण, आपत्कालीन प्रतिसाद आणि हवाई सुरक्षेसाठी मोठी मदत झाली. याबाबत कंपनीचे संचालक चेतन अरुण सावरकर यांनी सुरक्षित व स्मार्ट सार्वजनिक सुरक्षेसाठी स्वदेशी ड्रोन तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर झाल्याचा विश्वास व्यक्त केला.

## नक्षल दमन विरोधी सप्ताहानिमित्त गल्लाटोला येथे भव्य आरोग्य शिबिर

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा- राजु फुंडे**

गोंदिया जिल्हा पोलीस दलाच्या वतीने नक्षल दमन विरोधी सप्ताहानिमित्त सालेकसा पोलीस स्टेशन अंतर्गत सशस्त्र दुरक्षेत्र पिपरिया येथील मौजा गल्लाटोला येथे शुक्रवार, दि. २४ जुलै २०२६ रोजी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. दुर्गम भागातील नागरिकांना आरोग्य सेवा उपलब्ध करून देत जनजागृती करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सदर कार्यक्रम मा. पोलीस अधीक्षक गोरख भामरे, अपर पोलीस अधीक्षक अजय डोंगरे, उपविभागीय पोलीस अधिकारी




आमगाव नंदिनी चानापुरकर तसेच सालेकसा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नागोसे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी पोलीस कॅम्प पिपरियाचे प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक सागर चव्हाण प्रमुख उपस्थित होते.

ग्रामीण रुग्णालय सालेकसा येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. बघेले, डॉ. भलावी, डॉ. ठाकरे मॅडम व डॉ. जाधव यांच्या वैद्यकीय पथकाने ग्रामस्थांची तपासणी केली. पावसाळ्यात वाढणारे डेंग्यू, मलेरिया तसेच इतर संसर्गजन्य आजारांपासून बचावासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच गरोदर माता, शालेय विद्यार्थी आणि नागरिकांची आरोग्य तपासणी करून आवश्यक औषधांचे मोफत वितरण करण्यात आले.

या आरोग्य शिबिरात महिला, पुरुष व बालकांसह एकूण २३० ग्रामस्थांनी सहभाग नोंदवून आरोग्य सेवेचा लाभ घेतला. दुर्गम व नक्षलग्रस्त भागातील

### सशस्त्र दुरक्षेत्र पिपरिया पोलीस दलाचा लोकाभिमुख उपक्रम; २३० ग्रामस्थांची आरोग्य तपासणी

नागरिकांसाठी पोलीस प्रशासनाने राबविलेला हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्कृष्ट उदाहरण ठरल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

सदर आरोग्य शिबिर यशस्वी करण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक सागर चव्हाण, सहायक पोलीस हवालदार राजकपूर शेन्डे, पोलीस नाईक विकास माने, पोलीस अंमलदार राजेश मडावी, राज्य राखीव पोलीस बलातील अधिकारी व अंमलदार तसेच पोलीस भरती प्रशिक्षणार्थी यांनी मोलाचे सहकार्य केले. या उपक्रमामुळे पोलीस व नागरिक यांच्यातील विश्वासाचे नाते अधिक दृढ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# मोवाडच्या विकासकामांना गती, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची नगरपरिषदेला भेट

**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**

नरखेड तालुक्यातील मोवाड नगरपरिषदेला जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी भेट देत शहरातील सुरू असलेल्या विकासकामांचा तसेच आगामी प्रस्तावित कामांचा सविस्तर आढावा घेतला. शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने विविध योजनांच्या अंमलबजावणीबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देत कामांमध्ये गुणवत्ता आणि वेळेचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले.

यावेळी आयोजित आढावा बैठकीस नगराध्यक्ष दर्शना ढोरे, उपाध्यक्ष रवी मालोदे, नगरसेवक ललित खंडेलवाल, मुख्याधिकारी अमोल परिहार यांच्यासह नगरपरिषदेचे



पदाधिकारी, सभापती व अधिकारी उपस्थित होते. बैठकीत शहरातील प्रलंबित विकासकामे, नागरी सुविधांची स्थिती, रस्त्यांची अवस्था, पाणीपुरवठा, स्वच्छता, गटारी, सार्वजनिक सुविधा तसेच भविष्यातील विकास आराखड्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीनंतर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी शहराची प्रत्यक्ष पाहणी केली. यामध्ये शहरातील प्रमुख रस्ते, सुरू असलेली विकासकामे, नगरपरिषद इमारत तसेच महापुरात वाहून गेलेल्या श्रद्धांजली स्मारकाच्या जागेची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाच्या विकासकामांना प्राधान्य देऊन ती निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

तसेच शहरातील स्वच्छता व्यवस्थेची परिणामकारक अंमलबजावणी, पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या समस्या, जलनिस्सारण व्यवस्था, अतिक्रमण, सार्वजनिक आरोग्य सुविधा आणि मूलभूत नागरी सुविधांमध्ये सुधारणा करण्यावर भर देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. विकासकामांमध्ये कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नसून कामांच्या गुणवत्तेबाबत तडजोड होऊ नये, असे स्पष्ट निर्देश त्यांनी संबंधित यंत्रणेला दिले.

पाहणीदरम्यान नगरपरिषदेचे सर्व सभापती, नगरसेवक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या भेटीमुळे मोवाड शहरातील प्रलंबित विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## खापरखेडा येथे बँक ऑफ इंडियासमोरून दुचाकी चोरी

**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**

खापरखेडा मुख्य मार्गावरील गावंडे कॉम्प्लेक्समधील बँक ऑफ इंडिया शाखेसमोर उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना शुक्रवारी (दि. २४) दुपारी घडली. या प्रकरणी खापरखेडा पोलीस ठाण्यात एनसीआर दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी तपास सुरू केला आहे. भानेगाव येथील वार्ड क्रमांक ४ मधील रहिवासी नरेश महादेवराव गारघाटे हे दुपारी सुमारे १२.०८ वाजता बँक ऑफ इंडियाच्या खापरखेडा शाखेत पैसे काढण्यासाठी गेले होते. त्यांनी एमएच-४० एएफ-७३५४ क्रमांकाची काळ्या व लाल रंगाची दुचाकी बँकेसमोर उभी केली होती. काही वेळानंतर बँकेबाहेर आल्यानंतर दुचाकी जागेवर नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. परिसरात शोध घेऊनही दुचाकीचा मागमूस न लागल्याने त्यांनी खापरखेडा पोलिसांत तक्रार दाखल केली.

तक्रारीनुसार चोरीस गेलेल्या दुचाकीची अंदाजे किंमत ४ हजार ९०० रुपये आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ च्या कलम ३०३(२) अन्वये एनसीआर क्रमांक ०५६३/२०२६ दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. अलीकडच्या काळात खापरखेडा परिसरात दुचाकी चोरीच्या घटना वाढत असल्याने वाहनचोर पुन्हा सक्रिय झाल्याची चर्चा असून, नागरिकांनी वाहने सुरक्षित ठिकाणी उभी करावीत तसेच लॉकसह अतिरिक्त सुरक्षा उपायांचा वापर करावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# निर्मल नगरीत देवशयनी आषाढी एकादशी निमित्ताने विठ्ठलनामाचा अखंड गजर, हजारो भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

उमरेड मार्गावरील निर्मल नगरी येथील, श्री संत गजानन महाराज सेवा ट्रस्ट च्यावतीने देवशयनी आषाढी एकादशीच्या पावन पर्वावरील सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात आणि मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पहाटे पासूनच हजारो भाविकांनी मंदिरात उपस्थित राहून श्री विठ्ठल-रुक्मिणी तसेच श्री संत गजानन महाराजांचे दर्शन घेतले. संपूर्ण मंदिर परिसर "पांडुरंग पांडुरंग, विठ्ठल विठ्ठल विठ्ठल", "राम कृष्ण हरी", "ज्ञानोबा-तुकाराम" या अखंड नामघोषाने दुमदुमून गेला.



यावर्षी मंदिरात श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या मूर्तींची विविध प्रकारच्या फळे, फुले आणि आकर्षक सजावटीने मनमोहक आरास करण्यात आली होती. मंदिर परिसरातील विद्युत रोषणाई आणि भक्तिमय वातावरणामुळे निर्मल नगरीत जणू विदर्भातील दुसरे पंढरपूर अवतरल्याची भावना भाविकांनी व्यक्त केली. गेल्या पाच वर्षांपासून हा उत्सव भक्तिभावाने साजरा होत असून, दरवर्षी भाविकांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात वाढत आहे. पहाटेपासून दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. भजन, कीर्तन, हरिनाम संकीर्तन आणि



विठ्ठलनामाच्या अखंड गजराने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. महिला, पुरुष, ज्येष्ठ नागरिक, युवक-युवती तसेच लहान मुलांनीही मोठ्या श्रद्धेने या धार्मिक सोहळ्यात सहभाग नोंदविला.

पंढरीचा श्री विठ्ठल हा केवळ महाराष्ट्राचाच नव्हे, तर संपूर्ण विश्वाचे आराध्य दैवत मानला जातो. विठ्ठल, पांडुरंग, विठोबा, विठू माऊली, पंढरीनाथ, पंढरीराया अशा विविध प्रेमळ नावांनी ओळखल्या जाणाऱ्या या सावळ्या परब्रह्माच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली. भक्तांनी सुख, समृद्धी आणि सर्वांच्या कल्याणासाठी प्रार्थना केली. श्री संत गजानन महाराज सेवा ट्रस्टच्या पदाधिकारी व स्वयंसेवकांनी दर्शनासाठी उत्कृष्ट नियोजन करून भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ दिली नाही.

कार्यक्रमानंतर उपस्थित भाविकांना साबुदाणा खिचडी, उपवासाचे लाडू, केळी आणि खोवा जिलेबी यांचा महाप्रसाद वितरित करण्यात आला. या भक्तिमय आणि मंगलमय सोहळ्यामुळे निर्मल नगरी संपूर्ण दिवस विठ्ठलमय झाली असून, देवशयनी आषाढी एकादशीचा हा उत्सव भाविकांसाठी अविस्मरणीय ठरला.

दैनिक सिंहवाणी वृत्त


# पेंच प्रकल्पाचे पाणी तातडीने शेतकऱ्यांसाठी सोडा !

## महसूल मंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
खरीप हंगामातील पिकांना पाण्याची गरज लक्षात घेता पेंच प्रकल्पातील पाणी तातडीने शेतकऱ्यांसाठी सोडण्याचे निर्देश राज्याचे महसूल तथा अमरावती व नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.
एल-निनोच्या प्रभावामुळे यंदा पर्जन्यमानात घट होण्याची शक्यता लक्षात घेऊन राज्य शासनाने पिण्याच्या पाण्याच्या नियोजनाबाबत महत्त्वाचे निर्देश जारी केले आहेत. जलसंपदा विभागाने सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पाटबंधारे विकास महामंडळे, जिल्हा परिषद, महानगरपालिका तसेच नगरपरिषदांना ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्याचे नियोजन करण्याचे आदेश दिले आहेत.
शासनाच्या निर्देशानुसार, धरणांतील पाणीसाठ्याचे नियोजन करताना पिण्याच्या पाण्याची गरज, बाष्पीभवनामुळे होणारी पाण्याची घट, धरणांतील गाळ यांचा विचार करून आवश्यक पाणी राखीव ठेवण्यात येणार आहे. पिण्याच्या पाण्याच्या गरजा पूर्ण झाल्यानंतरच उर्वरित पाण्याचा वापर सिंचन व इतर कारणांसाठी करण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे
याशिवाय, जलाशयांतील पाणीसाठा, पर्जन्यमान आणि भविष्यातील संभाव्य परिस्थितीचा नियमित आढावा घेऊन पाणी वितरणाचे नियोजन वेळोवेळी पुनरावलोकन करण्याचे निर्देश बावनकुळे यांनी दिले. कोणत्याही परिस्थितीत पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होणार नाही, यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी विशेष दक्षता घ्यावी, असेहि त्यांनी स्पष्ट केले आहे.
शेतकऱ्यांना सिंचनासाठी वेळेवर पाणी उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक असून, पाण्याअभावी कोणत्याही शेतकऱ्याचे नुकसान होऊ नये, यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने पाणी सोडण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. पाणी वितरण करताना शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचेल, याची विशेष काळजी घेण्याचे निर्देशही बावनकुळे यांनी अधिका?यांना दिले.तसेच सिंचन विभागाने स्थानिक लोकप्रतिनिधी व पाणी वापर संस्था यांनी शेतकरी प्रतिनिधींशी समन्वय साधून पाणी वितरणाचे नियोजन करावे, पाण्याचा अपव्यय टाळावा आणि आवश्यक त्या ठिकाणी नियमित देखरेख ठेवावी, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.



शेतकरी हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. खरीप हंगामात पिकांना वेळेवर पाणी मिळणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे पेंच प्रकल्पातील पाणी नियोजनबद्ध पद्धतीने तातडीने सोडून प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत सिंचनाचा लाभ पोहोचेल, यासाठी प्रशासनाने प्राधान्याने कार्यवाही करावी.
**- चंद्रशेखर बावनकुळे,**
**महसूल व पालकमंत्री - नागपूर जिल्हा**

थोडक्यात

## आषाढी एकादशी निमित्त नगर परिषद नूतन प्राथमिक शाळाची उत्साहात बालदिंडी



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने नगर परिषद नूतन प्राथमिक शाळा, मंगळवारी पेठ, उमरेड येथे भक्तिमय वातावरणात बालदिंडी व मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा परिधान करून विठ्ठल-रुक्मिणीच्या जयघोषात, टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि अभंग-भजनांच्या सुरावटीत उत्साहपूर्ण मिरवणूक काढली. ही मिरवणूक श्रीराम टॉकीज परिसरातून मोठ्या उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांच्या भक्तिभावाने परिसरात आनंददायी आणि धार्मिक वातावरण निर्माण झाले. यावेळी शाळेच्या शिक्षिकांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व समजावून सांगितले. वारकरी संप्रदायाची परंपरा, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या विचारांची ओळख करून देत श्रद्धा, संस्कार, शिस्त आणि एकात्मतेचा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला.
या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीची आणि वारकरी परंपरेची जवळून ओळख झाली. शाळेच्या या उपक्रमाचे पालक व परिसरातील नागरिकांनीही कौतुक केले. यावेळी अनिता गायकवाड, मोसिम सर, शिला वांदिले, लीना झाडे, रंजित जांभूळकर यांनी आयोजन केले.

## नॅशनल इंग्लिश स्कूल नर्सरीची बालदिंडी



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**
बालदिंडीत लहान विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा परिधान करून हातात टाळ, मृदुंग, भगवे ध्वज आणि विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमा घेऊन भक्तिमय वातावरण निर्माण केले. ज्ञानोबा-तुकाराम, विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल अशा नामघोषांनी परिसर दुमदुमून गेला. बालदिंडी भवानी चौक, मिलन चौक आणि कांतीलाल चौक मार्गे उत्साहात काढण्यात आली. मार्गावरील नागरिकांनी बालदिंडीचे कौतुक करत विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या शिक्षिका रंजना वामन जोधे, कु. दीपा राऊ, प्रगती घुमडे, प्रेमलता नंदनवार, गजाला शेख मॅडम, अर्चना रोकडे आणि भाग्यश्री चनोरकर यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच शाळा प्रशासनाने विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, वारकरी परंपरा आणि धार्मिक मूल्यांची जपणूक व्हावी या उद्देशाने हा उपक्रम आयोजित केल्याचे सांगितले. या बालदिंडीमुळे विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदायाची ओळख तर झालीच, शिवाय आषाढी एकादशीचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्वही अनुभवता आले.

## विद्यामंदिर प्राथमिक विद्यालय कोराडी कॉलनी येथे आषाढी एकादशी निमित्त भव्य दिंडी आणि रॅलीचे आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, कोराडी**
आज आषाढी एकादशी निमित्त विठुरायाची आणि रुख्मिणीच्या वेशभूषा करून भव्य अश्या दिंडी आणि रॅली चे आयोजन कोराडी



कॉलनी परिसरातील विद्यामंदिर प्राथमिक विद्यालयाने आयोजन केले. या प्रसंगी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सांगोले सर, चौधरी मॅडम, तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक वर्ग आणि प्राथमिक विभागातील सर्वच विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी टाळ, मृदुंग, आणि विठ्ठल... विठ्ठल ध्यानोबा तुकाराम, पुंडलिक वरदा हरी विठ्ठल,... जय हरी विठ्ठलाचाअशा गजरात संपूर्ण परिसर भक्तिमय केला ,विद्यामंदिर प्राथमिक शाळा ती विठ्ठल मंदिर पर्यंत दिंडी पायी काढण्यात आली. पुढे रस्त्यावर भाऊ दोन दोन च्या रांगेने विद्यार्थी अतिशय छान वेशभूषा, हातात भगवे ध्वज घेऊन विठ्ठल नामाचा जप करत रॅली विठ्ठल मंदिरात आली. त्यानंतर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशी चे धार्मिक सामाजिक, सांस्कृतिक महत्व समजून सांगितले अतिशय भक्तिमय वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला.

## पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करण्याचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागामार्फत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कृषी कर्जमुक्ती योजना सन-२०२६ जाहिर करण्यात आलेली आहे. त्यासंबंधाने शासनाकडुन पात्र शेतकऱ्यांच्या याद्या पोर्टलवर प्राप्त झालेल्या आहेत. या याद्या संबंधीत तहसिल कार्यालय / सहाय्यक निबंधक /विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था / ग्रामपंचायत चावडीवर / जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखा / राष्ट्रीयकृत बँकेच्या शाखेच्या सुचना फलकावर प्रसिध्दीचे कामकाज सुरु करण्यात आलेले आहेत, तरी संबंधित पात्र शेतकऱ्यांनी आपले सरकार केंद्रावर जाऊन आपले विशिष्ट क्रमांकासह आधार प्रमाणिकरण तात्काळ करुन घ्यावे. अधिक माहितीसाठी संबंधित तालुक्याचे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कार्यालयास भेट घेवून अधिकचा तपशिल प्राप्त करुन घेता येईल, असे कळविण्यात आले आहे.

## महाराष्ट्र विद्यालयात पालक-शिक्षक संघाची स्थापना

### विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पालकांच्या सहभागावर भर



**दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा**
स्थानिक महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी पालक-शिक्षक संघाची स्थापना पालकांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत करण्यात आली. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक, बौद्धिक आणि सर्वांगीण विकास साधण्यासाठी पालक व शिक्षक यांच्यात अधिक प्रभावी समन्वय निर्माण करण्यावर यावेळी भर देण्यात आला.
बैठकीत विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती, शालेय शिस्त, सुरक्षितता, अध्ययनातील गुणवत्ता, संस्कारमूल्ये आणि विविध शैक्षणिक उपक्रमांमध्ये पालकांचा सहभाग वाढविण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. शाळेच्या प्रगतीसाठी पालकांनी सक्रिय सहकार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.
यावेळी पालक-शिक्षक संघाच्या नव्या कार्यकारिणीची निवड करण्यात आली. मुख्याध्यापक अरुण वडस्कर यांची अध्यक्षपदी, कविता भोसकर यांची उपाध्यक्षपदी, ए. आर. इवनाते यांची सचिवपदी, तर राजन यादव यांची सहसचिवपदी निवड करण्यात आली. तसेच इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंत प्रत्येक वगार्तून एका पालकाची प्रतिनिधी म्हणून कार्यकारिणीत निवड करण्यात आली.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक व मार्गदर्शन मुख्याध्यापक अरुण वडस्कर यांनी केले. सूत्रसंचालन अभय पुल्लिवार यांनी, तर आभार प्रदर्शन विजय टेकाडे यांनी केले.

## उत्कृष्ट कार्य करणाऱ्या माजी सैनिक व पाल्यांसाठी विशेष गौरव पुरस्कार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
विविध क्षेत्रात अति उत्कृष्ट कार्य करणाऱ्या माजी सैनिक/माजी सैनिक विधवा पत्नी/पाल्य सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये दहावीच्या परीक्षेत ९० टक्के व बारावीच्या परीक्षेत ८५ टक्केपेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. सोबतच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू पुरस्कार, साहित्य, संगीत, गायन, वादन, नृत्य व पुरस्कार यशस्वी उद्योजक संघ संगणक क्षेत्रात अतिउत्कृष्ट कामगिरी, पूर/जळीत/दरोडा / अपघात, नैसर्गिक आपत्तीमध्ये बहुमूल्य कामगिरी, देश/राज्याची प्रतिष्ठा वाढवतील अशा स्वरूपाचे काम करणारे माजी सैनिक/विधवा पत्नी/पाल्य आदींना एकरकमी रुपये २० हजार ते १ लाख रुपयांपर्यंत विशेष गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. अशा माजी सैनिक/पत्नी/पाल्यांनी या संधीचा लाभ घ्यावा.
विशेष गौरव पुरस्कार जिल्हा सैनिक कल्याण विभाग पुणे, यांच्यामार्फत प्रदान करण्यात येणार आहे तरी अजार्चा नमुना व माहिती जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात उपलब्ध आहे. आपले अर्ज १८ सप्टेंबर २०२६ पर्यंत जिल्हा सैनिक कार्यालय, नागपूर येथे जमा करावेत. असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी आनंद पाथरकर यांनी केले आहे.

## शेतकऱ्यांनी रेशीम शेती करण्याचे आवाहन

### खरीप हंगामापूर्वीच जिल्ह्यातील रेशीम शेतकरी झाले लखपती

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
रोजगारासाठी ग्रामीण भागातून शहरांमध्ये होणारे मोठ्या प्रमाणात स्थलांतर, पारंपारिक पिकांमधून कमी होत चाललेले उत्पन्न, निर्सगाचा लहरीपणा, वाढत असलेली बेरोजगारी या सर्व समस्यांवर रेशीम शेती हा रामबाण ऊपाय ठरु शकतो. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात रेशीम शेतीकडे वळावे, असे आवाहन जिल्हा रेशीम विकास अधिकारी अनिलकुमार ढोले यांनी केले आहे. खरीप हंगाम सुरु झाला असून जेमतेम पारंपारीक पिकांची लाडवडीस सुरुवात झाली असतांना जिथे शेतकऱ्यांजवळ उत्पन्न देणारे कुठलेही पीक हाती नाही, तिथे जिल्ह्यातील रेशीम शेतकऱ्यांनी रेशीम कोष विकून भरघोस उत्पन्न मिळवले आहे.
रेशीम कोषाचे पीक केवळ एक महिन्यांचे असते, एक एकर क्षेत्रावर शेतकरी वर्षभरात किमान चार पीके घेऊ शकतो. म्हणजेच जिथे पारंपारिक पीके घेणाऱ्या शेतकऱ्याजवळ वर्षातून केवळ दोन वेळा पैसे येतात तिथे रेशीम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांजवळ वषार्तून किमान चार वेळा पैसे येतात. नागपूर जिल्ह्यातील बरेच शेतकरी रेशीम शेती करुन त्यांचे उत्पन्न दुप्पटच नाही तर तिप्पट करीत आहेत.
नागपूर ग्रामीण तालुक्यातील देवळी (गुजर) येथील शेतकरी शिवाजी झोडे यांनी जून- २०२६ मध्ये रेशीम किटकांचे संगोपनास सुरुवात करुन २० जुलैला ७३३ रुपए प्रति किलो भावाने १४३.८९० किलो रेशीम कोषांची विक्री करुन रू.१ लाख ४ हजार ४१६ रूपयांचे उत्पन्न मिळवले आहे.

## नागपूरच्या ९ वर्षीय युगांतचा विश्वविक्रम

### ब्लाइंडफोल्ड कौशल्याची जागतिक पातळीवर नोंद, 'वंडर किड्स ऑफ द वर्ल्ड' ट्रॉफीचा मान

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
वयाच्या अवघ्या नवव्या वर्षी असामान्य एकाग्रता, स्मरणशक्ती आणि कौशल्याच्या जोरावर बेसा-घोगली येथील माऊंट लिटेरा झी स्कूलचा इयत्ता चौथीतील विद्यार्थी युगांत भुमेश वंजारी याने जागतिक स्तरावर नागपूरचा गौरव वाढविला आहे. इंडियन वर्ल्ड रेकॉर्ड फेडरेशन एलएलपीतर्फे आयोजित 'यंगेस्ट अँड फास्टेस्ट टू सॉर्ट मॅक्सिमम नंबर ऑफ मल्टीकलर्ड मार्बल्स इन्टू फाइव्ह कंटेनर्स व्हाईल ब्लाइंडफोल्डेड' या प्रकारात विश्वविक्रम नोंदवत त्याने प्रतिष्ठेची 'वंडर किड्स ऑफ द वर्ल्ड' ट्रॉफीही आपल्या नावावर केली आहे.
युगांतने डोळ्यांवर पट्टी बांधलेल्या अवस्थेत पाच वेगवेगळ्या रंगांचे ६० मार्बल्स अवघ्या ४८ सेकंदांत रंगानुसार पाच स्वतंत्र पात्रांमध्ये अचूकपणे वगीर्कृत करत हा अनोखा जागतिक विक्रम प्रस्थापित केला. या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत इंडियन वर्ल्ड रेकॉर्ड फेडरेशन एलएलपीने त्याला अधिकृत वर्ल्ड रेकॉर्ड प्रमाणपत्र प्रदान केले. त्याचबरोबर 'वंडर किड्स ऑफ द वर्ल्ड' या प्रतिष्ठेच्या ट्रॉफीनेही त्याचा सन्मान करण्यात आला.



या दैदिप्यमान यशाबद्दल केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते युगांतचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी गडकरी यांनी त्याच्या असामान्य कौशल्याचे कौतुक करत उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. युगांतच्या या यशामागे डॉ. किरण काकडे यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. किरण मिडब्रेन अकॅडमीमधील प्रशिक्षणामुळे त्याची एकाग्रता, स्मरणशक्ती, संवेदनक्षमता आणि ब्लाइंडफोल्ड कौशल्य विकसित झाल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. या यशात त्यांच्या प्रशिक्षणाचा मोलाचा वाटा असल्याचेही त्यांनी नमूद केले. युगांतच्या या अभिमानास्पद कामगिरीबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्याचे अभिनंदन केले. वडील भुमेश वंजारी आणि आई प्रिया वंजारी यांनी मुलाची जिद्द, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि योग्य प्रशिक्षण यामुळेच हे यश शक्य झाल्याची भावना व्यक्त केली.

## पारिवारिक स्नेहमीलनात रंगला भक्तिमय 'आनंद सोहळा'

### आषाढी एकादशीनिमित्त खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे विशेष आयोजन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रेरणेने सांस्कृतिक, क्रीडा, औद्योगिक आदी विविध महोत्सवांचे यशस्वी आयोजन केले जाते. या आयोजनामध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या सदस्यांचे पारिवारिक स्नेहमीलन ग्रँड एअरपोर्ट बँकेट्वेट हॉलमध्ये शनिवारी उत्साहात पार पडले. खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त आयोजित या स्नेहमीलनाचे प्रमुख आकर्षण ठरलेल्या 'आनंद सोहळा' या विशेष संगीत कार्यक्रमाने उपस्थितांना विठ्ठल भक्तिरसात



चिंब भिजवले.
नितीन गडकरी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. यावेळी खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाची संकल्पना व प्रभावी निवेदन रेणुका देशकर यांनी केले.
कार्यक्रमात गुणवंत घटवाई, अनिरुद्ध देशपांडे, आनंद देशमुख, डॉ. मंजिरी वैद्य, जयंत मंगरूळकर,भाग्यश्री बारस्कर या नामवंत गायकांसह
कांचन गडकरी, मधुरा गडकरी, प्रतिमा रोडी, अपूर्वा घुशे, मनीषा काशीकर, श्रीरंग वऱ्हाडपांडे आणि भारती गुप्ता या महोत्सव समितीच्या सदस्यांच्या कुटुंबातील गुणी कलाकारांनी संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत सावता माळी, संत जनाबाई, संत एकनाथ आणि संत तुकाराम महाराज यांच्या अभंग, हरिपाठ व भक्तिगीतांचे सुरेल सादरीकरण केले.
'ॐ नमोजी आद्या' या मंगलाचरणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. नामवंत गायकांनी सादर केलेल्या हरिपाठ, मोगरा फुलला, घनू वाजे, तीर्थ विठ्ठल, अमृताहुनी गोड, कांदा मुळा भाजी, आनंदाचे डोही, जे का रंजले गांजले आणि खेळ मांडीयेला या सारख्या रचनांनी सभागृह विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून गेले.
कांचन गडकरी यांनी संत जनाबाई यांची रचना 'ये गं ये गं विठाबाई', मधुरा गडकरी यांनी संत तुकाराम महाराज यांची 'सुंदर ते ध्यान', प्रतिमा रोडी यांनी संत एकनाथ महाराज यांची 'तो हा वेदमूर्ती',अपूर्वा घुशे यांनी संत जनाबाईच्या ओव्या, भारती गुप्ता यांनी केशवा माधवा रचना सादर करून रसिकांची दाद मिळवली.
तबल्यावर डॉ. दिपक खिरवडकर आणि प्रमोद बावने, पखवाजवर आशिष गायधन, ऑक्टोपॅडवर नंदू गोहाणे, सतारीवर दिपाली खिरवडकर, बासरीवर अथर्व मंगरूळकर, व्हायोलिनवर अथर्व भालेराव आणि हार्मोनियमवर राहुल मानेकर यांनी उत्कृष्ट साथसंगत केली. संगीत संयोजन आनंद मास्टे यांचे, तर ध्वनी संयोजन संदीप बारस्कर यांनी केले.
विठ्ठलनामाचा अखंड गजर, संतवाङ्मयाचा मधुर आविष्कार उपस्थित सदस्य व त्यांच्या कुटुंबीयांनी या भक्तिमय, आनंदमय सोहळ्याचा मनापासून आनंद देऊन गेला.

